सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, ०७ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळांचे राज्यपालांना साकडे!

### खटला' फास्टट्रॅक' वर चालवण्याचीही मागणी

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.६ जानेवारी : सरपंच संतोष देशमुख प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी राज्यभरात मोर्चे व निषेध होत असताना विरोधकांनी त्यासाठी सोमवारी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनाच साकडे घातले.

सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्यपाल भवनात त्यांची भेट घेत मुंडे यांच्या राजीनाम्यासह हा कटला फास्टट्रॅक वर चालवावा तसेच बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पुढाकार घेऊन शासनाला सूचना कराव्यात अशा मागण्याही करण्यात आल्या. शिष्टमंडळात माजी खासदार संभाजीराजे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार बजरंग सोनावणे, आष्टीचे भाजपाचे



आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर आणि ज्योती मेटे यांचा समावेश होता. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,बीडमध्ये खंडणी, अपहरण आणि इतर गुन्ह्यांचे प्रमाण वाढलं आहे. सरपंच संतोष देशमुख प्रकरण हे बीडमधील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेचे उदाहरण आहे .पोलिसांच्या कथित निष्काळजीपणा आणि पक्षपातीपणामुळे बीड जिल्ह्यात अशांतता पसरली आहे. राज्यभरातील सार्वजनिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे,

राज्यपालांच्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना स्वराज्य पक्षाचे नेते संभाजीराजे म्हणाले की , आधीच उशीर झाला आहे. या प्रकरणात मुळात महाराष्ट्राला न्याय द्यायचा आहे. हे प्रकरण जातपात आणि राजकारणाच्या पलीकडचे आहे. संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या होऊनही योग्य न्याय मिळाला नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात अशा घटना घडणार आहेत. त्यामुळे आम्ही राज्यपालांना हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. चौकशी होईपर्यंत मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी आमची मागणी आहे. अंबादास दानवे म्हणाले, सोमनाथ सुर्यवंशी यांची हत्यादेखील गंभीर आहे. सरकार मुंडे आणि कराडला वाचविण्याचा प्रयत्न करत आहे. एसआयटीमधील चौकशी अधिकारी आरोपींच्या जवळचे आहेत. सरकार ऐकत नाही म्हणून राज्यपालांची भेट घेतली. राज्यपालांनी सविस्तर मागणी ऐकली आहे.

**शिष्टमंडळाच्या मागण्या?**

सरपंच संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडे हे हस्तक्षेप करू शकतात. त्यामुळे त्यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, असे शिष्टमंडळानं राज्यपालांना सांगितले. कायदा आणि सुव्यवस्था असलेले राज्य आहे, अशी भावना बळकट करावी, अशी मागणी शिष्टमंडळानं राज्यपालांड केली.

### मंत्रिपद काही सहज मिळत नाही- भुजबळ

सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेतल्यानंतर राष्ट्रवादीचे आमदार छगन भुजबळ यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी अयोग्य असल्याचं पत्रकार परिषदेत सांगितले. ते म्हणाले, संतोष देशमुख हत्या प्रकरणात दोषी असेल त्याला फाशी द्या. गुन्हा सिद्ध होईपर्यंत मुंडे यांनी राजीनामा का द्यावा? धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागणं योग्य वाटत नाही. मंत्रिपद काही सहज मिळत नाही. कुणाचा तरी राजीनामा घेऊन मला मंत्री व्हायचं नाही. चौकशीत काहीच समोर आलं नाही, मग राजीनामा का मागता? कुणाची बाजू घ्यायची नाही.चौकशी पूर्ण होऊ द्या, एवढेच म्हणणें आहे. निरपराधाला शिक्षा होऊ नये, असे कायदा सांगतो. बीड प्रकरणात दोषींवर कारवाई होणार आहे. संतोष देशमुख यांचा निर्घृण खून झाला. खून कसा झाला हे आमदार धस यांनी सांगितले तेव्हा अंगावर शहारे आले होते. उल्लेखनीय बाब म्हणजे छगन भुजबळ यांना मंत्रिपद न मिळाल्याने त्यांची जाहीरपणं नाराजी व्यक्त केली होती.

# पंतप्रधानांच्या हस्ते विविध रेल्वे प्रकल्पांचा शुभारंभ

नवी दिल्ली, ०६ जानेवारी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, सोमवारी तेलंगणा, ओडिशा आणि जम्मू -काश्मीरमधील विविध रेल्वे प्रकल्पांचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे केले. यामध्ये जम्मू रेल्वे विभाग आणि तेलंगणातील एका टर्मिनल स्टेशनचा समावेश आहे. तसेच पूर्व किनारपट्टी रेल्वेच्या रायगडा रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी करण्यात आली.

यावेळी पंतप्रधान म्हणाले की, नवीन वर्षात भारत जोडणीचा वेगवान कायम राखला आहे. मला दिल्ली एनसीआरमध्ये 'नमो भारत' ट्रेनचा अद्भुत अनुभव आला आणि दिल्ली मेट्रोच्या महत्त्वाच्या प्रकल्पांचा शुभारंभ केला. आता आपल्या देशात मेट्रोचे जाळे १००० किलोमीटरहून अधिक आहे. गेल्या दशकात भारतीय रेल्वेचा ऐतिहासिक कायापालट झाल्याचे आपण पाहिले आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये बदल झाला आहे. यामुळे देशाची प्रतिमा बदलली



आणि देशवासीयांचे मनोबलही वाढले आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, प्रवाशांसाठी आधुनिक सुविधा, देशाच्या कानाकोपऱ्यात रेल्वेची जोडणी आणि रोजगार निर्मिती आणि उद्योगांना पाठिंबा, या चार मापदंडांवर आम्ही भारतीय रेल्वेचा विस्तार करत असल्याचेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद केले.

जम्मू रेल्वे विभागाचे उद्घाटन पठाणकोट-जम्मू-उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला, भोगपूर सिरवाल-पठाणकोट, बटाला-पठाणकोट आणि पठाणकोट ते जोगिंदर नगर विभागांना जोडेल. त्याची लांबी ७४२.१ किलोमीटर असेल. यामुळे भारताच्या इतर भागांतील रेल्वे संपर्कही सुधारेल. जम्मू विभागाच्या उद्घाटनामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील, पायाभूत सुविधांचा विकास होईल, पर्यटनाला चालना मिळेल आणि प्रदेशाचा एकूण सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. तेलंगणामधील चारलापल्ली नवीन टर्मिनल स्टेशनच्या ४१३ कोटी रुपये खर्च आला आहे. मेडचल-मलकाजगिरी जिल्ह्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे. हे नवीन टर्मिनल स्टेशन पर्यावरणपूरक असेल, प्रवाशांसाठी चांगल्या सुविधा असतील. यामुळे सिकंदराबाद, हैदराबाद आणि काचेगुडा यांसारख्या शहरांमधील सध्याच्या कोचिंग टर्मिनल्सवरील गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. पंतप्रधान मोदींनी ईस्ट कोस्ट रेल्वेच्या रायगड रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी करणार आहेत. यामुळे ओडिशा, आंध्र प्रदेश आणि आसपासच्या भागात कनेक्टिव्हिटी सुधारेल आणि प्रादेशिक विकासालाही चालना मिळणार असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

### छत्तीसगडमध्ये सुरक्षा पथकावर नक्षलवाद्यांचा हल्ला, ९ हुतात्मा

रायपूर : छत्तीसगडमधील बीजापूरमधल्या कुटरू भागात अंबेली गावाजवळ नक्षलवाद्यांनी सुरक्षा पथकावर हल्ला केला. या हल्ल्यात जिल्हा राखीव रक्षकांपैकी आठ जवान आणि जवानांच्या वाहनाचा चालक असे नऊ जण हुतात्मा झाले. अनेकजण जखमी झाले. हा हल्ला सोमवारी दुपारी सव्वादोन वाजता झाला. नक्षलवाद्यांनी आयईडीचा वापर करून सुरक्षा पथकाच्या वाहनाला लक्ष्य केले. हल्ल्याच्या वृत्ताला बस्तर रेंजच्या पोलीस महानिरीक्षकांनी दुजोरा दिला आहे.

याआधी शनिवारी अबुझमाड येथील जंगलात नक्षलवादी आणि सुरक्षा पथक यांच्यात चकमक झाली होती. या चकमकीत एक जिल्हा राखीव रक्षक आणि प्रधान आरक्षक सन्नू कारम हे हुतात्मा झाले. सुरक्षा पथकाने या चकमकीत चार नक्षलवाद्यांना ठार केले. ठार केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये एक महिला नक्षलवादी होती.

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण, ४५९० पानी आरोपपत्र दाखल, २१० साक्षीदार

मुंबई : काँग्रेसचे माजी आमदार आणि अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीचे काँग्रेसचे सदस्य असलेल्या बाबा सिद्दीकींची ऑक्टोबर २०२४ मध्ये हत्या झाली. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी मकोका न्यायालयात २६ अटकेतील आणि तीन फरार असलेल्या आरोपींच्या विरोधात ४५९० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. तपासाआधारे पोलिसांनी २१० साक्षीदारांच्या साक्षींची नोंद आरोपपत्रात केली आहे. पोलीस अद्याप झीशान अख्तर, शुभम लोणकर आणि अनमोल बिश्नोई या तीन आरोपींना शोधत आहेत.

बिश्नोई टोळीने दहशत निर्माण करण्यासाठी आणि स्वतःचा प्रभाव वाढवण्यासाठी बाबा सिद्दीकींची हत्या केली असा आरोप मुंबई पोलिसांनी आरोपपत्राद्वारे केला आहे. सलमानचे हितचिंतक असल्यामुळे बाबा सिद्दीकींची हत्या केल्याचा बनाव रचण्याचा प्रयत्न बिश्नोई टोळीने केला. प्रत्यक्षात फरार असलेल्या झीशान अख्तर, शुभम लोणकर आणि अनमोल बिश्नोई या तीन आरोपींनी बिश्नोई टोळीला मुंबईत पाय पसरणे सोपे व्हावे यासाठी बाबा सिद्दीकींची हत्या केली असा आरोप मुंबई पोलिसांनी केला आहे.

आरोपपत्रात लॉरेन्स बिश्नोईच्या नावाचा थेट उल्लेख नाही. आरोपी, फरार आरोपी अशा कोणत्याही स्वरुपात लॉरेन्स बिश्नोईच्या नावाचा आरोपपत्रात उल्लेख दिसत नाही. यामुळे लॉरेन्स बिश्नोईचा बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणाशी अप्रत्यक्षरित्या संबंध असावा, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. मुंबई पोलिसांनी बाबा सिद्दीकींच्या हत्येमागे तीन कारणं असल्याचे आरोपपत्रात नमूद केले आहे. सलमानशी असलेली जवळीक, अनुज थापनच्या आत्महत्येचा बदला आणि बिश्नोई टोळीचा प्रभाव निर्माण करणे या तीन कारणांसाठी बाबा सिद्दीकींच्या हत्या करण्यात आल्याचा आरोप मुंबई पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### वीज बिलांवर मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांचा फोटो!

डोंबिवली, ६ जानेवारी : जळगाव येथे वीज बिलांवर उद्धव ठाकरे यांचा फोटो असल्याने हा विषय मुख्यमंत्र्यांपर्यंत नेणार असल्याची माहती आमदार रवींद्र चव्हाण यांनी दिली. ही बाब जर चुकून झाली असेल तर ठीक मात्र जर हेतुपरस्पर घडत असेल तर संबधीतांवर शासन म्हणून कारवाई करण्यात येईल असेही चव्हाण यांनी स्पष्ट केले. रविवारी भाजपच्या देश राज्यव्यापी अभियानातर्फे डोंबिवलीत आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते शेलार नाका येथे संघटन पर्व या उपक्रमास सुरुवात करण्यात आली त्यावेळी आमदार चव्हाण यांनी या विषयावर आपले मत व्यक्त केले.

अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार पडले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाले.

# बिहारमध्ये उत्खननात आढळले प्राचिन शिव मंदिर

पाटणा, ०६ जानेवारी : बिहारच्या पाटणा शहरात उत्खननात सुमारे ५०० वर्षे प्राचिन मंदिर सापडले. शहरातील सुलतानगंज पोलिस स्टेशनच्या हद्दीत मठ लक्ष्मणपूर परिसरात हे मंदिर सापडले आहे. या



ठिकाणी जमिन खचल्यानंतर जमीन खोदण्यात आली तेंव्हा उत्खनन करण्यात आले त्यावेळी हे प्राचिन शिव मंडम मंदिर सापडले.

पाटनातील मठ लक्ष्मणपूरमध्ये शिव मंदिर मिळाल्याची माहिती या परिसरात वाऱ्यासारखी पसरली. या माहितीनंतर या ठिकाणी परिसरातील तसेच आसपासच्या भागातील नागरिकांनी गर्दी केली. यावेळी येथे जमलेल्या लोकांनी भगवान शंकराच्या नावाचा जयघोष करत पूजा आरती सुरू केली. या ठिकाणी बऱ्याच वर्षापूर्वी एक मठ होता. एका कौटुंबिक वादानंतर हा परिसर कचरा फेकण्यात आल्याने तसाच पडून होता. मात्र, ५ जानेवारी रोजी जमीन खचल्याने या परिसरातील नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले. या ठिकाणी खोदकाम सुरू करण्यात आले. तेंव्हा या ठिकाणी आश्चर्यकारक पद्धतीने एक भव्य आणि कलात्मक शिव मंदिर आढळले. आजुबाजुच्या परिसरातून मोठ्या संख्येने लोक या ठिकाणी शिव मंडप मंदिर पहायला गर्दी करू लागले. या ठिकाणी लोकांनी शिव मंडप मधील शिवलिंगाची स्वच्छता करून पूजा, आरती सुरू केली.

स्थानिक लोकांच्या मते हा मंडप ५०० वर्षे जुना असल्याचे दिसून येत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या प्लॉटवर काही लोकांनी बेकायदेशीरपणे कब्जा केला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर जेंव्हा या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली, तेंव्हा खोदकामात या ठिकाणी जमिनीतून काळ्या पाषाणात साकारलेलं भव्य शिव मंडप मंदिर समोर आलं. स्थानिकांच्या माहितीनुसार, या ठिकाणी अजुनही खोदकाम करण्यात येणार आहे.

### राष्ट्रीय सौर दिनदर्शिकाचे मंगळवारी प्रकाशन



छत्रपती संभाजी नगर : राष्ट्रीय सौर दिनदर्शिका शके १९४६-१९४७ चे प्रकाशन १७ पौष १९४६, ०७ जानेवारी, मंगळवारी सायंकाळी पाच वाजता राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते करण्याचे आयोजन केले आहे. विवेक देशपांडे यांचे निवासस्थान 'भारद्वाज' आदित्य नगर गारखेडा या ठिकाणी हा कार्यक्रम होईल. या प्रकाशन सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष नारायण पांडव, सचिव राहुल औसेकर यांनी केले आहे.

# खुलताबाद येथे श्री. भद्रा मारुतीची महाआरती; राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची प्रमुख उपस्थिती

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी, संतोष करपे. खुलताबाद येथे श्री.भद्रा मारुतीची महाआरती राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, आमदार अनुराधा चव्हाण, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ खुलताबाद भाजपा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे .यांची



प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन फुलंब्री भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ यांनी केले होते. कार्यक्रमाला सर्वप्रथम भद्रा मारुतीची महाआरती करून सुरुवात करण्यात आली. महाआरती झाल्यानंतर मंदिराच्या परिसरातच भक्तिमय सुर संगीत कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या भक्तीमय वातावरणात भाविकांनी सुर संगीत कार्यक्रमाचा लाभ घेतला. त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत आयोजक भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले. त्यानंतर महाप्रसादाचा सर्व भाविकांनी लाभ घेतला.

यावेळी राजू शिंदे, राधाकीसन पठाडे, सतीश दांडेकर परसराम बारगळ रामबाबा शेळके, सांडू जाधव, सविता फुके, जितेंद्र जैस्वाल, ऐश्वर्या गाडेकर, सविता नवले, गंगा ताठे, रविकांत गवळी, मुध्याधिकारी ऋषिकेश भालेराव, राजू प्रधान, सर्जेराव मेटे, दत्तू नाना करपे, जगन दाढे, दीपक खोतकर, सुरेश प्रधान, आनंदा ढोके, एकनाथ धटींग, संस्थान अध्यक्ष मिठू पाटील बारगळ आदींची उपस्थिती होती.

### नेपाळमध्ये विमानाला आग लागल्याने इमर्जन्सी लँडिंग

काठमांडू : नेपाळमधून एका मोठ्या अपघाताची बातमी समोर आली आहे. बुद्ध एअरलाइन्सच्या विमानाला उड्डाण दरम्यान आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. विमानाच्या डाव्या इंजिनमध्ये आग लागली, त्यानंतर काठमांडू येथील त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले आहे.या विमानामध्ये क्रू मेंबर्ससह ७६ प्रवासी होते.या अपघातात कोणी जखमी झाल्याची माहिती नाही. मिळालेल्या माहितीनुसार, बुद्ध एअरचे विमान राजधानी काठमांडूपासून ४३ किलोमीटर पूर्वेला त्याच्या डाव्या इंजिनमध्ये आग लागल्याने उतरल्याचे वृत्त आहे. त्यानंतर ते एकाच इंजिनवर उड्डाण करून काठमांडूला परतले. त्यानंतर सकाळी ११.१५ वाजता त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर मॅन्युअल लँडिंग केले. विमानात क्रू मेंबर्ससह ७६ लोक होते.




॥दुःखद निधन॥



कै.सौ. मेघना गजानन कीर्तिकर
मृत्यू दिनांक : ५ जानेवारी २०२५ (वय-८३)
प्रार्थना सभा
वेळ : गुरुवार दि.९ जानेवारी २०२५, सायं. ६ ते ८ वा.
स्थळ: नेस्को संकुल, मुंबई प्रदर्शन केंद्र, हॉल नं.'सी' ग्रॅन्डे, गेट नं. २, प. द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई
शोकाकुल
गजानन कीर्तिकर (शिवसेना नेते, माजी खासदार)
अमोल गजानन कीर्तिकर (शिवसेना उपनेते)
सौ. सुप्रिया अमोल कीर्तिकर
सौ. गौरी संकेत पाठारे - सौ. हर्षदा अनिल मोरे
कीर्तिकर व सार्दळ कुटुंबीय
दशक्रिया विधी : मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५ सकाळी ८ वा.
स्थळ : वैकुंठधाम स्मशानभूमी, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पूर्व)
बारावे/तेरावे विधी : गुरूवार दि. १६ जानेवारी २०२५
स्थळ : निवासस्थान - ५०३, स्नेहदीप, पहाडी रोड नं.२, आरे मार्ग, गोरेगाव (पूर्व)
५ जानेवारी रोजी अंत्यविधी व सांत्वन भेटीला आलेल्या आप्तस्वकीय, नातेवाईक, मित्रमंडळी, विविध राजकीय पक्षांचे नेते-पदाधिकारी यांचे आम्ही आभारी आहोत.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संघटन पर्व अंतर्गत सदस्यांना नोंदणी महाअभियानास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**



५ जानेवारी २०२५ रोजी धाराशिव शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. यावेळी नागरिकांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनाची माहिती देण्यात आली. यावेळी विविध या योजनेचे लाभार्थ्यांनी व नागरिकांनी सरकारचे आभार मानले.

यावेळी उपस्थित या अभियानाचे जिल्हा संयोजक इंद्रजीत देवकते, शहर संयोजक रोहित देशमुख, प्रसाद मुंडे, प्रदेश कार्यकारणी सदस्य विनोद गपाट, प्रवीण पाठक, जिल्हा उपाध्यक्ष सुनील काकडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहराजे निंबाळकर, शहराध्यक्ष अभय इंगळे, नाना धतुरे, रमण जाधव, संदीप इंगळे, अमोल राजेनिंबाळकर, सलमान शेख, ओमकार देवकते, सुनील पंगुडवाले, अभिजीत काकडे, दाजी पवार, दत्ता पेठे, अमोल पेठे, बापू पवार, बालाजी लोकरे, अमित कदम, सोमनाथ सर्जे, अनिल तावस्कर, बप्पा उंबरे, पुष्पकांत माळाळे, मिसा जनराव, गणेश घोडके, विलास लोंढे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### आ. पाटील यांचा सत्कार
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा शाखा धाराशिवच्या वतीने महाराष्ट्राच्या विधानसभेवर नवनिर्वाचित आमदार भाजपा राणाजगजीतसिंह पाटील यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्रांत सहकार्यवाह किशोर पिसे, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, कार्यवाह राजाभाऊ हुकिरे, प्रांत पदाधिकारी प्रशांत महाजन, कार्याध्यक्ष सतीश जाधवर, विशाल जाधव, शिवाजी चव्हाण, सतीश कानडे, वसंत पाटील, सचिन हुलसुलकर, खटके, सुनील क्षीरसागर, गणेश बळे, दत्ता राठोड व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



### तुळजापूरात भाजपा सदस्य नोंदणी
**तुळजापूर, दि.६ जानेवारी -**

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या आदेशाने व युवक नेतृत्व विनोद गंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले. शहरातील सर्व बुथ मध्ये लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. विशेषतः लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविल्यामुळे महिला वर्गाने जास्तीत जास्त सदस्य नोंदणीत सहभाग नोंदविला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहराध्यक्ष शांताराम पेंदे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राजेश्वर कदम, युवा मोर्चा शहराध्यक्ष राम चोपदार, दिनेश क्षीरसागर, सुरेखा पवार, नितीन पवार, रमेश पवार, राहुल चव्हाण, विक्रम पवार, सचिन राठोड, काशिनाथ पवार, अशिष साळुंके, अजय कांबळे, संकेत घोगरे, अजित तोडकरी व शहरातील प्रमुख सर्व भाजप कार्यकर्ते व बूथ प्रमुख उपस्थित होते.



### आय.एम. विनर स्पर्धा संपन्न
**उमरगा, दि.६ जानेवारी -**

ध्येय प्रकाशन अकॅडमी, महाराष्ट्र राज्य संचलित आय.एम. विनर स्पर्धा दि.६ जानेवारी रोजी उमरगा तालुक्यातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्या मंदिर उमरगा या केंद्रावर सुव्यवस्थितपणे पार पडली. या स्पर्धा परीक्षेचे संचालक डॉ. विनायक टाळकुटे यांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन क्लास घेतले. परीक्षेचे विभाग प्रमुख गोविंद जमादार, वर्षा शाईवाले व प्रणित सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांचा सराव घेतला. स्वामी विवेकानंद परीक्षा केंद्रावर मुख्याध्यापिका सविता लोहार केंद्राध्यक्ष म्हणून गोपाळ आष्टे, बाह्य परीक्षा विभाग प्रमुख गोविंद जमादार, वर्षा शाईवाले, प्रणित सूर्यवंशी, वेंकट वचणे, जैतूनबी मेंडके, निकीता आर्य, लक्ष्मी सूर्यवंशी यांनी परीक्षेचे कामकाज पाहिले.



### लोहाऱ्यात भाजपा सदस्य नोंदणी
**लोहारा, दि.६ जानेवारी -**

संघटन पर्व २०२४-२०२५ भाजपा सदस्य नोंदणी अभियान' अंतर्गत लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि.६ जानेवारी रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'संघटन पर्व २०२४-२५ भाजपा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ भाजपा तालुकाध्यक्ष शिवशंकर हत्तरगे भाजपा जिल्हा कोषाध्यक्ष नेताजी शिंदे, जिल्हा नोंदणी सहसंयोजक विक्रांत संगशेट्टी, नोंदणी तालुका संयोजक तथा तालुका सरचिटणीस दगडू तिगाडे, तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बबनगिरी महाराज, दिलीप पवार, संपत देवकर, बाबा सुंबेकर, प्रमोद पोतदार, संजय कदम, सुरेंद्र काळप्पा, युवराज जाधव, परमेस्वर कदम, निकेश बचाटे, सुयश दंडगुले, बालाजी सोनटक्के, जनक कुलकर्णी, विजय महानुर, कल्याण ढगे, सिद्धेश्वर बिडवे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### माय-लेकरास मारहाण
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**

येथील संभाजीनगर येथे एका तरूणाला व त्याच्या आईला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी धाराशिव आनंदनगर पोलिस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साकेत सुशिलकुमार सरवदे या तरूणाने दिलेल्या फिर्यादीनुसार सुरेंद्र महादेव रणदिवे, संगिता सुरेंद्र रणदिवे, विमल महादेव रणदिवे आणि अभिजीत रामलिंग रणदिवे यांच्या विरोधात धाराशिव आनंद नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोयाबीन खरेदीसाठी ४५ दिवसांची मुदतवाढ द्या

**पणन मंत्री रावल यांच्याकडे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**

सुरुवातीला आर्द्रता आणि त्यानंतर बारदाण्याच्या तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रांवर सोयाबीन घालता आलेले नाही. नोंदणीकृत शेतकऱ्यांची एकूण संख्या आणि बाजारात भाव मिळत नसल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला शेतकऱ्यांचा कल पाहता, अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी सोयाबीन खरेदीला ४५ दिवसांची मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी आपण पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांच्याकडे केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव जिल्हा आणि परिसरात खरीप हंगामातील नगदी पीक म्हणून सोयाबीनला बहुतांश शेतकऱ्यांची पसंती आहे. त्यामुळे यंदाच्या खरिप हंगामात ४ लाख ६२ हजार ८७२ हेक्टरवर सोयाबीनचा पेरा करण्यात आला होता. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीनला रास्त हमीभाव मिळावा, यासाठी जिल्ह्यात २१ हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहेत. सुरुवातीला हवामानातील बदलामुळे अपेक्षित आर्द्रता नसल्याने शेतकरी बांधवांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन घालण्यासाठी विलंब झाला. मागील आठवडा भरापासून बहुतांश खरेदी केंद्रांना बारदान्याची चणचण भासत आहे. परिणामी काही केंद्रांवरील खरेदी प्रक्रिया यामुळे ठप्प पडलेली आहे.



लवकरच बारदाना उपलब्ध होईल आणि खरेदी पूर्ववत सुरू होईल त्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे. सोयाबीनला सध्या खुल्या बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी बांधव यंदा मोठ्या संख्येने शासकीय खरेदीकडे वळले आहेत.

जिल्ह्यात ३२ हजार ००९ शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रांकडे नोंदणी केलेली आहे. त्यापैकी ५ हजार ३३८ शेतकऱ्यांच्या १ लाख ३३ हजार २२७ क्विंटल सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तर १४ हजार ५४१ शेतकऱ्यांना खरेदी केंद्राकडून मेसेज गेलेले आहेत.

जिल्ह्यातील बहुतांश सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांकडे आजही मोठ्या प्रमाणात सोयाबीन शिल्लक आहे. मात्र सुरवातीला आर्द्रता व त्यानंतर बारदाना तुटवडा यामुळे शेतकरी बांधवाना हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन घालता आलेले नाही.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या नोंदणीची मुदत ३१ डिसेंबरपासून ६ जानेवारीपर्यंत वाढविली आहे. मात्र खरेदीच्या मुदतीत अद्यापही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे मुळात ३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांचेच सोयाबीन १२ जानेवारीपर्यंत खरेदी होऊ शकणार नाही.

तर मग ६ जानेवारीपर्यंत नोंदणी होणाऱ्या शेतकऱ्यांचे सोयाबीन कसे खरेदी होणार? असा प्रश्न उपस्थित करीत, नोंदणीकृत शेतकऱ्यांची संख्या व बाजारात भाव मिळत नसल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला कल पाहता अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना हमीभाव योजनेचा लाभ मिळावा यासाठी सोयाबीन खरेदीसाठी ४५ दिवसांची मुदत वाढवून देण्यात यावी अशी मागणी पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांच्याकडे केली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## श्री तुळजाभवानी मंदिराला मिळणार पुरातन झळाळी

**जीर्णोध्दाराचे काम वेगात सुरू... देवीच्या मूळ गाभाऱ्याचे काम जलद गतीने सुरू...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जानेवारी -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या मंदिराला लवकरच पुरातन झळाळी लाभणार आहे. मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम सध्या वेगात सुरू आहे.

तुळजाभवानी देवीचा शाकंभरी नवरात्र महोत्सवा निमित्त सात दिवसाची निद्रा चालू असल्याने देवीचा मूळ गाभारा रिकामा असल्यामुळे देवीच्या मूळ गाभाऱ्याला पुरातनतत्व विभागाच्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार पुरातन रूप देण्याचे काम जलद गतीने चालू आहे. सध्या हे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून येत आहे. हजारो वर्षांच्या अनमोल अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या तुळजाभवानी देवीच्या मंदिरासह मंदिर परिसरातील उपदेवतांच्या मंदिरांनाही प्राचीन गतवैभवाचे रूप मिळणार आहे.

लवकरच राज्यासह देशभरातील देविभक्तांना तुळजाभवानी देवीच्या मंदिराचा मूळ प्राचीन गाभारा याची देही याची डोळे मनभरून पाहता येणार आहे.



## परंड्यात आर्थिक वादातून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**

परंडा येथील बसस्थानकावर आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून झालेल्या वादात एका ४० वर्षीय व्यक्तीला काचेच्या बाटलीने मारहाण करून जखमी करण्यात आले आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली अशी की, अरूण दशरथ खडके (वय ४०, रा. माळी गल्ली परंडा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भैय्या अर्जून सोनवणे आणि सौरव बनसोडे या दोघांनी दि.४ जानेवारी रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास परंडा बसस्थानकावरील त्यांच्या पान टपरीसमोर आर्थिक व्यवहारावरून त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण करत काचेच्या बाटलीने वार करून जखमी केले. तसेच आरोपींनी जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी परंडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## नगरपरिषद कचरा डेपोमुळे संपूर्ण परिसरास भीषण आग



**तातडीने अग्निशमक गाडी घटनास्थळी आल्याने आग आटोक्यात...भीषण आगीत हजारो झाडे जळून खाक...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जानेवारी -**

नळदुर्ग रोड वरील नगर परिषदेच्या कचरा डेपोला दि.६ जानेवारी रोजी दुपारी दीड दोनच्या सुमारास अचानक आग लागून संपूर्ण फॉरेस्ट डोंगर परिसराला भीषण आग लागली बघता बघता आगीने चांगलाच भडका घेत कचरा डेपो पासून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पर्यंत ही आग पसरत गेली. काही क्षणातच आगीने भीषण रूप धारण केल्यामुळे मोठ्या प्रमाणात आग पसरत गेली. आगीचा वनवा एवढा भीषण होता की परिसरातील नागरिक घाबरून गेले होते.



या आगीमध्ये डोंगरावर असणारे हजारो वृक्ष जळून खाक झाले. महाविद्यालयाचे प्राध्यापक अमोद जोशी यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांना फोन केला. रोचकरी यांनी नगरपरिषदेस ही बाब कळवून अग्निशामक गाडी तातडीने पाठवण्यास सांगितले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अवघ्या काही मिनिटातच घटनास्थळी अग्निशामक दलाची गाडी आली आणि कचरा डेपो पासून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय परिसरात अग्निशामक गाडीतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेऊन ही भीषण आग आटोक्यात आणली.

दोन अडीच तास परिश्रम घेऊन अग्निशामक दलाचे प्रमुख देविदास देवकते फायरमन अजयरत्न सोनवणे, संजय बनसोडे, चालक हर्षद क्षीरसागर यांनी भीषण पेटलेली आग आटोक्यात आणून संभाव्य दुर्घटना टाळली.

## खेटा पूर्ण करण्यासाठी खंडोबा मंदिरात भाविकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ जानेवारी -**

नळदुर्ग (मैलारपुर) येथे श्री खंडोबा यात्रेपुर्वीच्या शेवटच्या रविवारी म्हणजे पाचव्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटे पासुनच मोठी गर्दी केली होती.

श्रीक्षेत्र मैलारपुर येथे दि.१२ ते १४ जानेवारी या कालावधीत श्री खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे. दि.६ जानेवारी रोजी यात्रेपुर्वीच्या शेवटच्या रविवारी म्हणजे पाचव्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी भल्या पहाटेपासुनच मंदिरात मोठी गर्दी केली होती.

बोरी नदीवर स्नान करुन अनेक भाविक बोरी नदी घाट ते मंदिरापर्यंत देवाला दंडवत घालत येत होते. त्याचबरोबर देवाला नैवेद्य दाखविणे, बाशिंग बांधणे, मंदिरावर खोबरे-भंडारा उधळणे आदी धार्मिक विधी भाविकांकडुन पार पाडले जात होते. यावेळी दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती.

यात्रेपुर्वीचा हा शेवटचा रविवार आहे. त्यामुळे गर्दीत देवाचे दर्शन नको म्हणुन अनेक भाविक याठिकाणी दर्शनासाठी आले होते.

यात्रा सात दिवसांवर आली असल्याने श्रीक्षेत्र मैलारपुरात मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात व्यवसायिकांनी दुकाने थाटली आहेत.

नळदुर्ग-मैलारपूर श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांना व्यवस्थित दर्शन व्हावे यासाठी दर्शन रांग तयार केली आहे. त्याचबरोबर भाविकांना याठिकाणी मोफत अन्नदान वाटप केले जात आहे.

## मा. मंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते भाजपा सदस्यता नोंदणी अभियाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ जानेवारी -**



भारतीय जनता पक्षाच्या सदस्यता नोंदणी अभियानाला राज्यभरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, याच अनुषंगाने मुरूम (ता.उमरगा) येथे सदस्य नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले. बसवराज पाटील यांच्या सह सर्व उपस्थितांनी सदस्यता नोंदणी केली.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी हे अभियान यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना सर्वतोपरी योगदान देण्याच्या बसवराज पाटील यांनी सूचना केल्या.

यावेळी यावेळी धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अध्यक्ष बापूराव पाटील, सचिन पाटील, गोविंद पाटील, रशिद शेख, श्रीकांत बेंडकाळे, देवेंद्र कंटेकूरे, अनिल सगर, विक्रम मस्के, नगरसेवक महेश माशाळकर, परमेश्वर टोपगे, संचालक विजय सोनकटाळे, महालिंग बाबशेट्टी, विरभद्र बरबडे, अप्पू गुंजोटे, सिद्राम बालकुंदे, राजूभाई मुल्ला, शिवशंकर नागोबा, ताशकंद टेलर, फैजान मुल्ला उपस्थित होते.

## परंड्यात भारतीय जनता पार्टीचे सदस्य नोंदणी अभियान



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ जानेवारी -**

भारतीय जनता पार्टी देशातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टी चे आज सदस्य नोंदणी अभियान छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने नोंदणी करण्यात आली.

यावेळी भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव टोंपे, सरचिटणीस विकास कुलकर्णी, जिल्हा चिटणीस सुजित परदेशी, विठ्ठल तिपाले, प्र.का. सदस्य ॲड. झहीर चौधरी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, अविनाश विधाते, सारंग घोगरे, रामकृष्ण घोडके, भालचंद्र औसरे, सुबोधसिंह ठाकूर, समरजीतसिंह ठाकूर, तानाजी पाटील, धनाजी गायकवाड, बाबासाहेब जाधव, साहेबराव पाडुळे, निशीकांत क्षिरसागर, प्रभाकर लिमकर, बाळासाहेब गोडगे, सागर पाटील, धनंजय काळे, गौरव पाटील, सुरज काळे, आदर्श ठाकूर, आकाश मदने, तुषार कोळेकर, महिला मोर्चा शहराध्यक्षा ज्योती भातलवंडे, शुभदा शेलार, गायत्री तिवारी, जमदाडे, पाटील तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## पालकांचे छत्र हरवलेल्या चिमुकल्यांना ज्ञानराज चौगुले यांचा आधार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ जानेवारी -**





उमरगा तालुक्यातील तुरोरी येथील प्रमोद व प्रणिता कराळे यांचे मागील काही दिवसांपुर्वी अपघाती निधन झाले होते. त्यांच्या पश्चात तीन मुली व आई असा परिवार असुन तिन्ही मुलींच्या शिक्षणासाठी शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या वतीने प्रत्येकी ५० हजार रू. या प्रमाणे एकुण दीड लाख रूपये मदत करण्यात आली आहे.

तुरोरी येथील प्रमोद कराळे व त्यांच्या पत्नी प्रणिता कराळे यांचे दि.१८ डिसेंबर रोजी रात्री साडेसात च्या दरम्यान लक्ष्मी पाटीजवळील अपघातात निधन झाले होते. यानंतर माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांनी मयत कुटुंबाची भेट घेऊन तीनही मुलींचे पुढील शिक्षण पुर्ण करण्याची जबाबदारी स्विकारली होती व प्रत्येकी पन्नास हजार रूपयांचे आर्थिक सहाय्य करण्याचे आश्वासित केले होते. दिलेला शब्द पाळण्यासाठी युवासेना विभागीय निरीक्षक आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते प्रतिक्षा कराळे, प्रांजल कराळे, व प्रज्ञा कराळे या तिन्ही मुलींच्या नावे प्रत्येकी ५० हजार रूपयांची मुदत ठेव ठेवलेले प्रमाणपत्र मुलींची आज्जी विमल कराळे, मामा गणेश सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत सुपुर्द केले.

यावेळी शिवसेना शाखाप्रमुख विजयकुमार भोसले, उपसरपंच तुकाराम जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष पवन जाधव, भाजपचे बालाजी माणिकवार, शाहुराज भोसले यांच्यासह सौदागर सुर्यवंशी, नंदकिशोर पाटील, आनंद शिंदे, नवनाथ जाधव आदींची उपस्थिती होती.

# विद्यापीठ संघाने रचला इतिहास आंतरविद्यापीठ स्पर्धेत महिला बुद्धिबळ संघ विजेता





तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ जानेवारी

भोपाळ येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा महिला बुद्धिबळ संघाने सातव्या फेरीत विजय पटकावला. पहिल्यांदा विजेतेपदावर नाव कोरीत विद्यापीठ संघाने इतिहास घडविला.

या संघात संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय खेळाडू भाग्यश्री पाटील,संस्कृती वानखडे, तनिषा बोरामनीकर,सानिया तडवी,साचल बिहाणी, संघमित्रा यांनी पहिल्या फेरीत डॉ.सुभाष विद्यापीठ जुनागड (गुजरात) संघाविरुद्ध ४०० ने विजय मिळवला.दुसऱ्या फेरीत गुजरात टेक्नॉलॉजी विद्यापीठाविरुद्ध ४-० ने विजय मिळविला.तिसऱ्या फेरीत बलाढ्य असलेल्या भरती विद्यापीठ, पुणे संघातील खेळाडू आकांक्षा हगवणे हिला भाग्यश्री पाटील हिने बरोबरीत रोखत आपल्या संघाला ०.५ गुण मिळवून दिले.सानिया तडवी,संस्कृती वानखडे आणि तनिषा बोरामनीकर यांनी विजय संपादन करून ३.५-०.५ गुण मिळवत स्पर्धेत आघाडी मिळवून दिली.चौथ्या फेरीत सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे विरुद्ध ३.५-०.५ विजय मिळविला. बलाढ्य युनिव्हर्सिटी ऑफिस मुंबई विरुद्ध ३.५-०.५ विजय

छत्रपती संभाजीनगर: पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत विजेता ठरलेला विद्यापीठाचा संघ.


मिळवत स्पर्धेच्या विजेतेपदावर पकड मजबूत केली. सहाव्या फेरीत महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ एण्ड सायन्स नाशिक विरुद्ध ३.५-०.५ ने विजय मिळवत औपचारिकता शिल्लक ठेवली.सातव्या व अंतिम फेरीत वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिव्हर्सिटी संघाला सरळ ४-० ने धूळ चारत विजेतेपदावर नाव कोरले.

विजेतेपद पटकावणाऱ्या संघाचे अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य रावसाहेब बारोटे, प्रोफेसर डॉ. दिलीप बिरुटे,प्रोफेसर पंडित नलावडे,डॉ. साईराज तडवी,डॉ. निलेश गावडे,डॉ.सैराज तडवी,डॉ.सुशील जावळे,डॉ. शत्रुघन भोरे व क्रीडा विभाग प्रमुख निलेश गाडेकर आदींनी अभिनंदन केले.

## संघ हीच जीवनगाथा

अलक (६)

### वंदे मातरम



आता ही सर्व भावंडे महादेवाच्या संस्कारात मोठी होत होती. याचवेळी लोकमान्यांचा 'केसरी' शिवरामपंत परांजपे यांचा 'काळ' या अंकाचे घरोघरी वाचत होत असे. हे वाचन स्फुल्लिंग चेतवत असे. डॉक्टर बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनी राष्ट्रीय वृत्तीच्या मित्रांचा एक संघ उभा केला. त्यात हा सोळा वर्षाचा केशव पण सहभागी झाला होता. त्यातच २९ सप्टेंबर १९०५ ला बंगालची फाळणी झाली. परंतु वंगभंग चळवळींनी साऱ्या देशातच वेग घेतला वंदेमातरम हा मंत्र सर्व देशात निनादू लागला. सर्वच प्रांतातल्या जनमानसात देशभक्ती जागृत होऊ लागली. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## न्यायासाठी पैठणला ९ जानेवारीला महामोर्चा



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ : कैलासवाशी सरपंच संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांना व कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी व निष्क्रिय प्रशासनाच्या निषेधार्थ पैठण तालुक्याच्या वतीने महामोर्चा काढण्यात येणार आहे. त्याच नियोजन संदर्भात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर येथे सर्व पक्षीय आणि सकल समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार न्याय महामोर्चा येत्या १० जानेवारी २०२५ रोजी या तारखेला होणार आहे. या दिवशी होणारा महामोर्चा सकाळी ९.०० वाजता कावसानकर स्टेडियम पासून सुरु होणार असुन छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर या ठिकाणी समारोप होइल. तसेच या महामोर्चात छत्रपती संभाजी राजे, आमदार सुरेश आण्णा धस, मराठा आरक्षण संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील, आमदार संदीप क्षीरसागर, खासदार संदिपान भुमरे, ऑल इंडिया पँथरचे अध्यक्ष दीपक भाई केदार, विनोद भैया पाटील याबरोबरच स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबातील सदस्य सुद्धा उपस्थित राहणार आहेत.

## विभागीय लोकशाही दिनाचे १३ जानेवारी रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर : विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी १३ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तसेच नियमित विभागीय लोकशाही दिन संपल्यानंतर विभागीय माहिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

## टि.सी. हरवली

नामे स्वप्निल गोरक्ष भोसले सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील विद्यार्थी असून डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची बी.कॉम. ची डिग्री खेर्डा खुर्द ते तालखेड दरम्यान हरवली आहे.. डिग्री सापडल्या संपर्क साधावा

संपर्क : ७७७६८२२५८६

## एज्ड लक्झरी सिंगल माल्ट्स, रेअर आणि धुआ

पुणे : साऊथ सीज डिस्टिलरीज, भारतातील सर्वात जुनी माल्ट डिस्टिलरी आणि देशातील सर्वात मोठ्या मॅच्युरेशन वेअरहाऊसने हरियाणामध्ये क्रेझी कॉक सिंगल माल्ट व्हिस्कीचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे. रेअर आणि धुआ अशा दोन उत्कृष्ट गुणवत्ता असलेल्या, क्रेझी कॉक सिंगल माल्ट व्हिस्की आता राज्यभरातील आघाडीच्या रिटेल आउटलेटमध्ये उपलब्ध आहेत. चार दशकांहून अधिक काळापासून माल्ट कौशल्याने तयार केलेली ही व्हिस्की भारतातील सर्वात एज्ड लक्झरी सिंगल माल्ट आहे. अत्यंत मर्यादित प्रमाणात मिळणारी हि व्हिस्की महाराष्ट्रातील डहाणू येथील साऊथ सीज डिस्टिलरीजच्या अत्याधुनिक सुविधांमध्ये बनवली जाते. भारतातील वातावरणात डिस्टिलरी क्रेझी कॉक सिंगल माल्ट सारखी व्हिस्की तयार केली जाते, जी २५ वर्षीय एज्ड व्हिस्की सारखीच आहे. हे सिंगल माल्ट्स भारतातील हवामानातील ओक पिपांमध्ये ठेवल्याने त्याला एक अनोखी उत्तम चव येते. चार दशकांहून अधिक माल्ट अनुभवासह, साउथ सीज डिस्टिलरीज भारताच्या माल्ट व्हिस्की वारशाचा आधार असून अग्रगण्य जागतिक ब्रँडसाठी जागतिक दर्जाच्या माल्ट्सचे उत्पादन करते. क्रेझी कॉक सिंगल माल्ट त्यांच्या स्वतःच्या लक्झरी ग्राहक ब्रँडचे अनावरण करण्यासाठी नवीन बदल करते. संस्थापकाच्या प्रेरणेने हा प्रयत्न सिंगल माल्ट ब्रूइंग हा केवळ व्यवसाय नव्हे तर एक कला म्हणून दाखवतो.

## एसयूडी लाइफ मिडकॅप मोमेंटम इंडेक्स फंड लॉन्च

नाशिक : स्टार युनियन डाई-इचि लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाइफ) या नवीन वर्षात एसयूडी लाइफ मिडकॅप मोमेंटम इंडेक्स फंड सुरू करण्याची घोषणा करत आहे, ज्यामुळे पॉलिसीधारकांना भारताच्या उत्साही मिड-कॅप बाजारातील वाढीच्या संधीचा लाभ घेण्याची रोमांचक संधी मिळते. ज्यांना माहित नाही, मिडकॅप कंपन्या त्या आहेत ज्या सिद्ध व्यवसाय मॉडेलसह उच्च वाढीसाठी तयार आणि इक्विटी बाजारात कमी गुंतवणूक केलेल्या आहेत. जरी मिड-कॅप निर्दे शांक उच्च अस्थिरता दर्शवू शकतात, तरीही ते अनेकदा मोठ्या कॅप निर्देशांकांपेक्षा दीर्घकालीन दृष्ट्या उत्कृष्ट परतावा देतात, त्यामुळे हे वाढीच्या दिशेने लक्ष केंद्रित करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी आकर्षक निवड बनतात. दुसरीकडे, मॉमेंटम गुंतवणूक कमी जोखमीसह असते. एसयूडी लाइफ मिडकॅप मोमेंटम इंडेक्स फंड, ज्यात ६ महिन्यांच्या पुनर्संतुलनाची प्रक्रिया आहे, सर्वोत्तम कार्यरत स्टॉक्स हायलाइट करते आणि पद्धतशीरपणे कमी कार्यक्षम स्टॉक्स काढून टाकते. ही पुनर्संतुलन पद्धती मजबूत परताव्यावर लक्ष केंद्रित करत असताना, कमी अस्थिरता दर्शविणाऱ्या स्टॉक्सना सुद्धा बक्षिसे देते.

## ॲक्सेलने उभारला नवीन ६५० मिलियन यूएस डॉलरचा फंड

छत्रपती संभाजीनगर : आघाडीची ग्लोबर व्हेंचर कॅपिटल फर्म ॲक्सेलने आज ६५० मिलियन यूएस डॉलरचा प्रारंभिक टप्प्याचा फंड उभारल्याची घोषणा केली आहे, जो भारत आणि दक्षिण-आशियातील धाडसी संस्थापकांना पाठिंबा देण्यासाठी समर्पित आहे. ॲक्सेलचा हा आठवा फंड प्रारंभिक टप्प्यातील संस्थापकांसोबत भागीदारी करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेवर आधारित आहे, ज्यायोगे परिवर्तन घडविणारे आणि श्रेणी-निर्धारण करणारे व्यवसाय उभारले जातील, जे अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करतील. ॲक्सेल आपल्या ४० हून अधिक वर्षांच्या अनुभवाचा आणि जागतिक प्लॅटफॉर्मचा लाभ घेत, संस्थापकांना त्यांच्या क्षेत्रात आघाडी मिळविण्यासाठी मार्गदर्शन, नेटवर्क्स आणि समर्थन प्रदान करते.या फंडाद्वारे, ॲक्सेल कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ग्राहक ब्रँड्स, फिनटेक आणि उत्पादन क्षेत्रातील संस्थापकांसोबत भागीदारी करण्यास पुढे प्रोत्साहन देणार आहे.

## नेहा जोशी १०० वर्ष जुन्या बेंचवर बसल्यानंतर झाल्या भावूक

एण्ड टीव्हीवरील मालिका 'अटल'मध्ये कृष्णा देवी वाजपेयींची भूमिका साकारणाऱ्या प्रतिभावान अभिनेत्री नेहा जोशी या मालिकेचा पहिला वर्धापन दिन साजरा करण्यासाठी नुकतेच ग्वाल्हेरला गेल्या होत्या. ही फक्त ट्रिप नव्हती तर इतिहासाची माहिती देणारी, महान नेता स्वर्गीय श्री. अटल बिहारी वाजपेयी यांना मानवंदना देणारी भेट ठरली, त्यांचा वारसा आजही लाखो व्यक्तींना प्रेरित करत आहे. नेहा यांच्यासाठी हा प्रवास त्यांच्या भूमिकेच्या सेलिब्रेशनपेक्षा अधिक ठरला आणि त्यांना वैयक्तिक अनुभव मिळाला.

## इंडस्ट्रीतील सर्वोत्कृष्ट लेखकांपैकी एक प्रिया माझी पत्नी

झी टीव्हीचा 'सा रे ग म प' भारतातील एक आवडता सिंगिंग रिॲलिटी शो, त्याच्या प्रतिभा, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या परिपूर्ण मिलाफाने प्रेक्षकांना मोहित करत आहे. अंतिम फेरीसाठी फक्त एक महिना बाकी असताना, स्पर्धा आता अधिक कडवी झाली आहे आणि अख्खा देश त्यांच्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आपल्या स्क्रीन्सला खिळून राहिले आहेत. सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली, ह्या प्रतिभावंत कलाकारांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रूपांतर केले जात आहे. ह्या वीकेन्डला दीर्घ प्रतीक्षेतील 'रेस-टू-दि-फिनाले' एपिसोड संगीतप्रेमींसाठी नक्कीच खास असेल कारण ह्या शोमध्ये संगीत उद्योगातील नावाजलेल्या ज्यूरी सदस्यांचे स्वागत केले जाईल.

## श्रीराम आपल्याला आपल्यातले वाटतात

सोनी सबवरील 'श्रीमद् रामायण' मालिकेत श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांचे जीवनचरित्र उलगडले आहे. ही मालिका टेलिव्हिजनवर एक वर्ष पूर्ण करत आहे. हे यश साजरे करताना एका खास मुलाखतीत सुजय रेऊ आपल्या या प्रवासाविषयी सांगत आहे. श्रीरामाची शांत आणि धीरगंभीर मूर्ती उभी करण्यापासून ते काही सामर्थ्यशाली क्षण जगण्यापर्यंतचे अनुभव घेताना आपण या भूमिकेत किती समरसून गेलो, ते सांगत आहे, अभिनेता सुजय रेऊ.

## 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत पुष्पा आणि दिलीप एकत्र

पुष्पा (करुणा पांडे) या एका करारी आणि निडर स्त्रीची प्रेरणादायक गोष्ट सांगून सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. आजवर आयुष्यातील सर्व आव्हानांना तिने हिंमतीने आणि दृढतेने तोंड दिले आहे. अलीकडच्या भागांमध्ये नववर्षाच्या कौटुंबिक सेलिब्रेशनमध्ये नाट्य तीव्र झाले, जेव्हा अचानक तिकडे बापोद्रा चाळीचा मालक, बापोद्रा (जयेश भारभाया) तेथे येऊन धडकला आणि त्याने पुष्पाचा पूर्वीचा पती दिलीप (जयेश मोरे) याला घर खाली करण्याची नोटिस दिली. ह्यामुळे समस्त कुटुंबाला धक्काच बसला.

# राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुकडी व घोड कालवा सल्लागार समितीची बैठक संपन्न

पुणे, दि. ६: कुकडी प्रकल्पातून सध्या सुरू असलेले रब्बी आवर्तन क्र .१ गृहीत धरून एकूण चार तसेच घोड प्रकल्पातून यापूर्वी खरीप हंगामात दिलेले एक आवर्तन तसेच सध्या सुरू असलेले रब्बी हंगामातील आवर्तन क्र.१ अशी दोन धरून एकूण चार आवर्तन देण्याचा निर्णय राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुकडी संयुक्त प्रकल्प कालवा सल्लागार समिती बैठकीत घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या या बैठकीस आमदार काशिनाथ दाते, विक्रम पाचपुते (दूरदृश्य प्रणालीद्वारे) , ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके, शरद सोनवणे, नारायण आबा पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, कृष्णा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हेमंत धुमाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), समितीची सदस्य आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, शेवटच्या टोकापर्यंत पाणी मिळेल असे सूक्ष्म नियोजन पाटबंधारे विभागाने करावे. पीक पाहणी नुसार नियोजन करावे. प्रत्यक्षात पिकांचा प्रकार आणि गरज लक्षात घेऊन पाणी द्यावे. पाण्याचे आवर्तन सोडताना स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घ्याव्यात.

सर्व भागात, पोटचाऱ्यांना समन्यायी पद्धतीने पाणी मिळेल याकडे लक्ष द्यावे. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना काटकसरीने सर्व शेतकऱ्यांना पाण्याच्या पाळ्या देण्याचे नियोजन करावे जेणेकरुन पुढील आवर्तनांसाठी अधिक पाणी उपलब्ध होऊ शकेल. पिंपळगाव जोगा कालव्याच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करावा असे निर्देशही त्यांनी दिले.

पुणे जिल्हा परिषदेने पाणी साठविण्यासाठी साठवण तलावाच्या पर्यायावरही विचार करावा. कुकडी कालव्यालगतची झाडे - झुडुपे काढण्यासाठी साखर कारखान्यांनी जेसीबी उपलब्ध करून दिल्यास इंधनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. धरणातील गाळ काढण्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात यावे, यासाठी उद्योग संस्थांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा उपयोग करावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी पाणी सोडण्याच्या नियोजनाबाबत उपस्थित आमदार महोदयांनी विविध सूचना केल्या. कुकडी संयुक्त प्रकल्पात येडगाव, माणिकडोह, वडज, पिंपळगाव जोगे व डिंभे मिळून एकूण १९.४३६ टी.एम. सी. पाणीसाठा उपलब्ध आहे. कुकडी डावा कालव्याद्वारे दुसऱ्या आवर्तनासाठी २० फेब्रुवारीपासून पाणी सोडण्याचे बैठकीत ठरले. तसेच कुकडी प्रकल्पाचे आगामी आवर्तन पूर्ण झाल्यानंतर शिल्लक राहिलेला पाणीसाठा, तसेच पुढील पावसाळ्यापूर्वीची टंचाईची परिस्थिती पाहून उन्हाळी आवर्तनाबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल, असे श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

घोड प्रकल्पात २.४६ टी.एम.सी. पाणीसाठा उपलब्ध आहे. प्रकल्पाचे दुसरे आवर्तन २० फेब्रुवारीपासून सोडण्याचे नियोजन असल्याचे यावेळी सांगण्यात आले. श्रीगोंदा आणि शिरूरच्या लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करून नियोजन करावे अशी सूचना मंत्रीमहोदयांनी केली. बैठकीच्या सुरवातीला कुकडी सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता संतोष सांगळे यांनी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा व नियोजनाबाबत सादरीकरण केले. बैठकीस कार्यकारी अभियंता प्रवीण घोरपडे, प्रशांत कडूस्कर, उत्तम धायगुडे, राजेंद्र धोडपकर आदी उपस्थित होते.

## जि.प.प्रा.शाळा निंबायती तांडा येथे बाल आनंद मेळावा संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ जानेवारी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निंबायती तांडा ता.सोयगाव येथे बाल आनंद मेळावा सोमवार रोजी १०:३० वा आयोजित करण्यात आला होता.या मेळाव्याचे उद्घाटन निंबायती तांडाचे सरपंच सुनिता राजेंद्र पाटील या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होत्या तर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहिदास जाधव शाळेचे मुख्याध्यापक सोनजी पाटील तसेच मोहन सोमला चव्हाण पोलीस पाटील,मुलचंद राठोड यांच्या हस्ते सरस्वती मातेचे प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्याची जाणीव व्हावी यासाठी आयोजित करण्यात आला.या वेळात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ स्टॉल लावले होते.यामध्ये भेळ,भजे,गुलाब जामुन,आप्पे,वडापाव,बोरे इत्यादी खाद्यपदार्थ बनवून विक्री केली.या मेळाव्यासाठी व्हावी तांडा,निंबायती गाव येथील विद्यार्थी शिक्षक यांनी हजेरी लावली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक सोनजी पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार संदीप चौधरी यांनी मानले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक वृंद मोलाचे सहकार्य केले.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकारांचे स्वागत



तभा वृत्तसेवा

फर्दापूर ६ फर्दापूर: येथील माणिकराव पालोदकर विद्यालयात मराठी पत्रकारितेची पायाभरणी करणारे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक के.आर.पाटील यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शिक्षक पी.आर.पाटील यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवन कार्याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली.यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी पत्रकार दिनानिमित्त स्थानिक पत्रकारांचा सत्कार विद्यालयाच्या वतीने करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.आर.पाटील यांनी केले एच.डब्ल्यू काकडे यांनी आभार मानले.

यावेळी मुख्याध्यापक के. आर.पाटील, एच. डब्ल्यू.काकडे वाय.एन.सोन्ने, श्रीमती भोंबे, श्रीमती.दौड, एस.आर.बावस्कर, ए.लोखंडे, गायकवाड, रबडे, विविध वृत्तपत्राचे प्रतिनिधी रमेश पाटील, शिवाजी महाकाळ, अशोक हातोळे, सागर भुजबळ, अनिल रावळकर योगेश महाकाळ,शेख अजहर हे व विद्यार्थी उपस्थित होते.

## बनोटी येथील जिल्हा परिषद शाळेत पोलीस दल वर्धापन दिनानिमित्त (रेझिंग डे) साजरा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ जानेवारी

पोलीस आणि जनतेत संबंध वाढावेत, पोलीस खात्याचा कामकाज,वाहतूक तसेच महिला सुरक्षा व सायबर क्राइम आदींची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी,या हेतूने सोयगाव तालुक्यातील बनोटी येथील जिल्हा परिषद शाळेत सोमवारी (दि.६) पोलीस दल वर्धापन दिनानिमित्त (रेझिंग डे) साजरा करण्यात आला .

पोलीस अधीक्षक संभाजीनगर ग्रामीण विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली २ जानेवारी ते ८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे उपक्रमा अंतर्गत बनोटी येथील जिल्हा परिषद शाळेत पोलीस उपनिरीक्षक गणेश झलवार यांनी ७ वी ते १० वी. च्या ४०० विद्यार्थी,विद्यार्थिनी यांचेशी रेझिंग डे निमित्ताने संवाद साधून त्यांना गुड टच,बॅड टच,सायबर गुन्हेगारी,सोशल मीडियाचा गैरवापर,अंमली पदार्थ व व्यसनांचे दुष्परिणाम,महिला व मुलींवरील होणारे अत्याचार व कायद्यांबाबत मार्गदर्शन केले.तसेच पोलीस हेल्पलाइन क्रमांक ११२ चाइल्ड हेल्पलाइन १०९८, महिला हेल्पलाइन १०९१, सायबर हेल्पलाइन १९३० बाबत माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे तसेच गुन्हेगारी यावरती परिक्षा घेण्यात आली या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा पोलीस दलाकडून गौरविण्यात येणार आहे.यावेळी पोलीस उपनिरीक्षक गणेश झेलवार,पोलीस उपनिरीक्षक निरीक्षक रज्जाक शेख,राजेंद्र बर्डे,श्रीकांत तळेगावकर,संदिप सुसर, विकास दुबेले,मुख्याध्यापक एन.व्ही पाटील,आर.डी. सोनवणे,प्रिया पेठकर,संदिप सोनवणे आदी उपस्थित होते.

## वसमतनगर नगरपरिषद, वसमतनगर

जिल्हा हिंगोली

Phone No.02454 220175 www.basmatmc.org E-mail: cobasmatgmail.com

जा.क्र./कावी/बांधकाम/६७/२०२५ दिनांक : ०८/०१/२०२५

### विशेष अतिरिक्त निधी योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत ई-निविदा सुचना

मुख्याधिकारी, नगरपरिषद वसमत जिल्हा हिंगोली फोन नं. ०२४५४ २२० १७५ ई मेल (cobasmat@gmail.com), http://mahatenders.gov.in विशेष अतिरिक्त निधी योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत प्रभाग क्र. ११ व १२ मध्ये रस्ता मजबूतीकरण व आर.सी.सी. नाली बांधकाम करणेच्या कामांकरीता ई-टेंडर पध्दतीने दि.२३/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदे विषयी http://mahatenders.gov.in वर दि.०७/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन दि.२३/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पहावयास मिळेल. प्राप्त निविदा शक्य तो दि. २७/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. तथापि काही अपरिहार्य कारणास्तव त्याच दिवशी निविदा उघडु न शकल्यास नवीन वेळ व दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

(निलेश सुकेवार)
मुख्याधिकारी
नगरपरिषद, वसमत

## वसमतनगर नगरपरिषद, वसमतनगर

जिल्हा हिंगोली

Phone No.02454 220175 www.basmatmc.org E-mail: cobasmatgmail.com

जा.क्र. कावि/पाणीपुरवठा/ ६८/२०२५ दिनांक : ०६/०१/२०२५

### (पाणीपुरवठा विभाग) निविदा सुचना

नगरपालिका क्षेत्रात पध्दतीने निविदा (AFP) विजागरी सेवा व सुविधेची काने येत असून कोच्या निविदा दि. ०८-०१-२५ रोजी सकाळी ११.00 वाजेपासून दि. २४-०१-२५ सुविधेची कामे साल सन २०२४-२०२५ अंतर्गत कामाकरीता ऑफलाईन वेळेत उपलब्ध असतील. प्राप्त निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे. याबाबत सायंकाळी ५.00 वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन विस्तृत माहिती पाणीपुरवठा निविदा, स्वीकारण्याचा अध्यालय, वसमत यांचेकडे उपलब्ध होईल. शक्यतो निविदा दि. २७-०१-२५ बंधनकारक असेल. रोजी उघडण्यात येतील. तसेच निविदा धारकास खालील अटी व शर्तीची पूर्तता करणे

| अ. क्र. | कामाचे नांव | प्र.मा. रक्कम | अंदाजपत्रक रक्कम (Cat, Royalty LI वगळून) | अनामत रक्कम २% | बिलातील कपात ३% | कोरी निविदा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्र.क्र. १२ मध्ये गणेशनगर येथे पिण्याच्या पाण्याकरिता HDPE लाईन टाकणे | १000000 | ७५९४६९ | १५२00 | २२८00 | ८00 | १00 दिवस |

### निविदा बाबत माहिती

अटी व शर्ती :-

१) सदरील निविदा सुचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) निविदा धारकांनी इतर सुचना निविदा नमुन्यामध्ये सदर निविदा कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवले आहे.
३) निविदेची किंमत व सुरक्षा अनामत राष्ट्रीयकृत बँकेचे एफडीआर / रोख मुख्याधिकारी नगरपरिषद वसमत यांच्या नावाने भरणा करावी लागेल.
४) निविदे सोबत आवश्यक त्या अभिलेखाच्या सत्यप्रती कार्यालयात दोन लिफाफा पध्दतीने बंद पाकिटात सादर करावे लागतील.
५) शासन नियमानुसार ईपीएफची रक्कम भरण्याची जबाबदारी संबंधीत गुत्तेदाराची राहील.
६) कामाची गुणवत्ता व दर्जा बाबत सक्षम अधिका-या मार्फत तांत्रिक तपासणी करुन घ्यावी.
७) मंजुर अंदाजपत्रकीय भौतिक मानकानुसार काम करावे.
८) शासन निर्णय क्र. एम. सी.ओ-२०१८ /प्र.क्र.४५/नवि-१४ दि.२७/०९/२०१८ अन्वये अध्यक्ष व मुख्याधिकारी यांची समितीव्दारे निविदा उघडण्यात येतील.
९) सदर कामाचा अनुभव असणारांना प्राधान्य देण्यात येईल.

(नितीन चव्हाण)
कनिष्ठ अभियंता
नगरपरिषद वसमत

(रमेश वाघमारे)
नगर अभियंता श्रेणी 'अ'
नगरपरिषद वसमत

(निलेश सुकेवार)
मुख्याधिकारी
नगरपरिषद वसमत

## अग्रलेख...

# बिघडलेली 'इंडिया' आघाडी

विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीमध्ये काही दिवसांपासून गोंधळ सुरू आहे. हा गोंधळ काँग्रेसला सर्वाधिक अस्वस्थ करीत आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व करण्यास तयार असल्याचे सांगितले तेव्हा 'इंडिया' आघाडीमध्ये सर्व काही ठीक नाही, याचे संकेत मिळाले. उद्योजक गौतम अदानी प्रकरणावरून काँग्रेस संसदेत गोंधळ घालत असताना ममता यांचे हे वक्तव्य आल्यानंतर 'इंडिया' आघाडीमधील इतर सर्व पक्ष अदानी मुद्याला महत्त्व देण्यास फारसे तयार नसल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेसला अदानी मुद्यावर प्रादेशिक पक्षांपुढे झुकावे लागले, हे विचित्र आहे. ममता या 'इंडिया' आघाडीच्या योग्य नेत्या असल्याच्या विधानांना इतर काही नेत्यांनी आणि विशेषतः लालूप्रसाद यादव यांनीही पाठिंबा दिला होता. समाजवादी पक्षाचे सरचिटणीस रामगोपाल यादव यांनी 'इंडिया'चे नेते राहुल नसून मल्लिकार्जुन खडगे असल्याचे सांगितल्यावर काँग्रेसच्या मित्रपक्षांना राहुल यांचे नेतृत्व आवडत नसल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेस राहुल गांधी यांच्याकडे 'इंडिया' आघाडीचे केवळ नेतेच नाही, तर भावी पंतप्रधान म्हणूनही पाहात आहे. अलिकडेच आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी दिल्लीतील काही काँग्रेस नेत्यांवर दिल्ली लोकसभा निवडणुकीत 'आप'चा पराभव करून भाजपाच्या विजयाला हातभार लावल्याचा आरोप केला. त्यामुळे 'आप' आणि काँग्रेसमधील दरी वाढत चालली आहे. हरयाणा विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने युती न करता स्वबळावर निवडणूक लढवल्यापासून या दोन पक्षांत कमालीचे अंतर वाढले आहे. भाजपापेक्षा आता तेच परस्परांचे शत्रू असल्यासारखे वागायला लागले आहेत. दरम्यान, आम आदमी पक्षाचे नेते काँग्रेसवर संतप्त झाले आहेत. अजय माकन यांनी तर केजरीवाल यांच्यावर फसवणुकीचा आरोप केला आहे. ज्या केजरीवाल यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचा पराभव केला, त्यांचे चिरंजीव माजी खासदार संदीप दीक्षित हेच आता केजरीवाल यांच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढवणार आहेत. 'आप'ने खाजगी संस्थांमार्फत सुरू केलेल्या सर्वेक्षणाविरोधात दीक्षित यांनी आता उपराज्यपालांकडे तक्रार केली आहे. 'आप'ची महत्त्वाकांक्षी 'महिला सन्मान योजना' आता चौकशीच्या फेऱ्यात अडकली आहे. २०१३ मध्ये आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन सरकार स्थापन करणे ही काँग्रेसची चूक होती, हे आता माकन यांनी मान्य केले. गेल्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आम आदमी पक्षाशी झालेली आघाडीही त्यांनी अयोग्य ठरवली आहे. माकन यांनी तर केजरीवाल यांना देशद्रोही म्हटले. त्यांच्या वक्तव्यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी आणि राज्यसभा सदस्य संजय सिंह यांनी इशारा दिला की, काँग्रेसने माकन यांच्यावर कारवाई न केल्यास आम आदमी पक्ष 'इंडिया'मधून काँग्रेसला हटवण्याची मागणी करेल. वास्तविक पाहता, 'इंडिया' आघाडीतून काँग्रेसची हकालपट्टी करण्याची मागणी हास्यास्पद आहे. 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांमधील तणाव वाढत असल्याचे यावरून दिसून येते. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली 'इंडिया'ची स्थापना झाली, तेव्हा ही आघाडी केवळ भाजपाला पर्यायी धोरणे आणि विचारांद्वारे विरोध करणार नाही, तर देशाला राजकीय दिशा देण्याचे काम करेल, असे मानले जात होते; परंतु ती पर्यायी विचार देऊ शकली नाही. 'इंडिया' आघाडी देशासमोर कोणताही प्रभावी दृष्टिकोन किंवा किमान समान कार्यक्रम मांडू शकली नाही. भाजपाला राज्यघटना बदलायची आहे, असे वातावरण काँग्रेसच्या नेतृत्वाखालीच निर्माण झाले. अशा वातावरणामुळे लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ९९ जागा मिळाल्या आणि भाजपाच्या जागा २४० वर आल्या, तेव्हा विरोधी 'इंडिया' आघाडीचा विजय झाल्यासारखे वातावरण तयार करण्यात आले. हा प्रचार काँग्रेसने सर्वाधिक केला; पण हरयाणा आणि नंतर महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या निकालांनी लोकसभेच्या निवडणुकीतील 'इंडिया' आघाडीने मिळविलेला विजय हा अपघात होता, हे सिद्ध झाले. कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल आणि काही प्रमाणात हरयाणा-पंजाबमध्ये काँग्रेसचे प्रभावी अस्तित्व आहे. इतर राज्यांमध्ये ती एकतर खूपच कमकुवत आहे किंवा प्रादेशिक पक्षांच्या दयेवर आहे. लोकसभेमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून तो नक्कीच उदयास येतो; पण त्यात मित्रपक्षांचे योगदान आहे. दिल्लीमध्येही काँग्रेसची पीछेहाट झाली आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये केजरीवाल काँग्रेससोबत समन्वय साधणार नसल्याचे आधीच स्पष्ट झाले होते. दिल्लीमध्ये आम आदमी पक्ष, भाजपा आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होऊ शकते. गेल्या १० वर्षांच्या सत्ताविरोधी समस्येवर मात करण्यासाठी आम आदमी पक्ष जोरदार प्रयत्न करत आहे. तिरंगी लढत झाल्यास भाजपाकडून 'आप'चा पराभव होईल. भाजपासाठी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. काँग्रेसने दिल्लीमध्ये जोर लावून निवडणूक लढवू नये, असे 'आप'ला वाटते, तर दिल्लीत काँग्रेसची ताकद वाढली, तरच 'आप'चा पराभव करता येईल, असे भाजपाचे गणित आहे. दिल्लीत जोरदार मुकाबला करायचा असेल, तर भाजपासह काँग्रेसला 'आप'वर हल्लाबोल करावा लागणार आहे. दिल्लीनंतर बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. तिथे झारखंडमधील झारखंड मुक्ती मोर्चाप्रमाणेच काँग्रेस राष्ट्रीय जनता दलावर अवलंबून असेल. काँग्रेसला स्वतःचे भले करायचे असेल तर प्रादेशिक पक्षांसारखे राजकारण करणे टाळावे लागेल. काँग्रेसने जातनिहाय जनगणना, दलित आणि मागासवर्गीयांचे एकत्रीकरण, अल्पसंख्यकांचे तुष्टीकरण, डॉ. आंबेडकरांचा वारसा आदींच्या आधारे राजकारण केले तर प्रादेशिक पक्षांना अडचणी येतील, असा अंदाज आहे. प्रादेशिक पक्षांच्या मुद्यांवर काँग्रेसने राजकारण करणे टाळले, म्हणून 'इंडिया' आघाडीच्या नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला, यात आश्चर्य नाही. काँग्रेसला राष्ट्रीय पक्ष म्हणून आपली प्रतिमा मजबूत करायची असेल आणि भाजपाचा मुकाबला करायचा असेल तर मूळ विचारसरणीच्या आधारे राजकारण करावे लागेल. मित्रपक्षांनी स्वबळावर राजकारण करायला सुरुवात केली आणि काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली तर लोकसभेतील संख्याबळाचा आलेख खाली जाईल, हे काँग्रेसला माहीत नाही असे नाही; परंतु तिला उमगत नाही. काँग्रेस बळकट झाली तर ती आपल्यासाठी धोक्याचे ठरेल, हे भाजपालाही ठावूक आहे. त्यामुळे काँग्रेसला लक्ष्य करण्याबरोबरच तो मित्रपक्षांनाही इशारा देत आहे. प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देणे भाजपाच्या पथ्यावर पडणार आहे. आपली स्थिती सुधारण्यासाठी काँग्रेसला भाजपाशी एकहाती लढा द्यावा लागेल. सध्या काँग्रेसची केवळ काही राज्यांमध्ये भाजपाला स्वबळावर तोंड देण्याची क्षमता आहे. गेल्या महिनाभरात अनेक प्रमुख मुद्यांवर 'इंडिया' आघाडीतील सहा पक्षांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यामुळे 'इंडिया' आघाडी पुन्हा संयुक्त पुरोगामी आघाडीत बदलत असल्याची चर्चा आहे. २०२३ मध्ये, विरोधी पक्षांनी संयुक्त पुरोगामी आघाडी संपवून 'इंडिया' आघाडीची स्थापना केली. नितीशकुमार यांनी २०२२ मध्ये 'यूपीए'च्या विस्ताराची कल्पना मांडली. यासाठी त्यांनी केजरीवालांपासून ममता बॅनर्जींपर्यंत आणि अखिलेश यादवांपासून माकपच्या सीताराम येचुरींपर्यंत सर्वांशी संपर्क साधून रणनीती आखली. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये २६ पक्षांसोबत 'इंडिया' आघाडी तयार झाली. त्यात द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस, झारखंड मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय जनता दल या पक्षांचा आघाडीमध्ये समावेश होता. समाजवादी पक्ष, आप, तृणमूल काँग्रेस, बीएपी आणि आरएलपीए यासारखे नवीन पक्षही आघाडीत सामील झाले. तथापि, जानेवारी २०२४ मध्ये नितीशकुमार यांनी आघाडी सोडत 'एनडीए'मध्ये सामील झाले होते. समाजवादी पक्ष हा लोकसभेतील तिसरा सर्वांत मोठा पक्ष इंडिया आघाडीमध्ये असला, तरी अनेक प्रसंगी या पक्षाने समाजवादी पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या संभल दौऱ्यावरून दोन्ही पक्षांमध्ये मतभेद झाले होते. आता अखिलेश यांनी दिल्ली निवडणुकीत आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन आपले इरादे व्यक्त केले आहेत. एकंदरीत, इंडिया आघाडीतील दरी चांगलीच रुंदावली आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# नव्या वर्षाची नवी आव्हाने!

सन २०२५! नवे वर्ष सुरू होऊन जेमतेम आठवडा होत असताना, देशाला एका आव्हानाचा मुकाबला करावा लागणार आहे आणि हे आव्हान आहे ढासळणारा रुपया सावरण्याचे! आणखी २५ दिवसांनी लोकसभेत सादर केल्या जाणाऱ्या वार्षिक अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांना ढासळणाऱ्या रुपयाकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. विशेष म्हणजे जगात भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने एक मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत असताना रुपया घसरत आहे.

**डॉलर मजबूत** : जगातील १२ प्रमुख देशांचे चलन अमेरिकेच्या डॉलरच्या तुलनेत कमजोर झाले आहे. म्हणजेच डॉलर मजबूत झाला आहे. काही महिन्यांपूर्वीपर्यंत एका डॉलरसाठी ८४ रुपये मोजावे लागत होते. आता डॉलर रुपया विनिमय दर ८६ रुपयांच्या घरात पोहोचला आहे. काही महिन्यांपूर्वी सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे रुपयाला बळकटी मिळत होती. यातून रुपयाला एक प्रकारची स्थिरता आली होती. डॉलरच्या तुलनेत रुपया कधी कधी वधारतही होता. मात्र, रुपयाची घसरण होत असताना ती फार मामुली होत होती. देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया किती मजबूत आहे, याचे ते एक निदर्शक होते. मात्र, मागील महिन्यात अचानक रुपया वेगाने घसरू लागला व त्याने देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर एक नवे आव्हान निर्माण केले.

**अमेरिकन निवडणूक?** : अमेरिकन निवडणूक निकालांचा हा परिणाम असल्याचे मानले जाते. नवनिर्वाचित राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांची धोरणे डॉलर मजबूत करणारी राहतील, असे मानले गेले. त्याचा स्वाभाविक परिणामही झाला. मागील काही काळात डॉलर मजबूत झाला तर रुपयाची घसरण वेगात झाली.

**केवळ दोन महिन्यांत** : एका डॉलरसाठी ८४ ऐवजी ८५ रुपये मोजावे लागण्याची प्रक्रिया केवळ दोन महिन्यांत पूर्ण झाली म्हणजे दोन महिन्यांत डॉलर एका रुपयाने वधारला. तर, हाच डॉलर ८३ रुपयांवरून ८४ वर जाण्यासाठी तब्बल १४ महिने लागले होते. याचा दुसरा अर्थ म्हणजे या काळात रुपयाची स्थिती चांगली होती तसेच डॉलरला ८२ वरून ८३ रुपयांपर्यंत जाण्यासाठी १० महिने लागले होते. म्हणजे या काळातही रुपया ठीकठाक होता. मात्र, मागील दोन महिन्यांत रुपया कमालीचा कमजोर झाला असून या काळात डॉलर एक रुपयाने महागला.

**आता ८६ कडे वाटचाल?** : रुपया एका डॉलरसाठी ८५ रुपयांवर जाऊन थांबलेला नाही. तो वेगाने ८६ च्या आकड्याकडे जात आहे. रिझर्व्ह बँकेने हस्तक्षेप करून रुपया घसरण्याची प्रक्रिया रोखण्याचा प्रयत्न केला. त्यात काही प्रमाणात यश आले. पण, नंतर रुपया पुन्हा घसरू लागला. गेल्या काही दिवसांत तो ८६ चा आकडा पार करील, अशी लक्षणे आहेत.

**तोटा आणि फायदाही** : रुपया घसरण्याचा, फायदा व तोटा असे दोन्ही परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार असल्याचे मानले जाते. सर्वांत मोठा तोटा म्हणजे कच्च्या तेलाची आयात महाग होणार आहे. याचा फटका काही काळाने सामान्य ग्राहकालाही बसण्याची चिन्हे आहेत. कारण भारतातील पेट्रोलियम कंपन्या फार काळ रुपया कमजोर होण्याचा ताण सहन करू शकणार नाहीत. त्यांना पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ करावीच लागेल. राजधानीत वाहनांना गॅस पुरविणाऱ्या सीएनजीच्या दरात एका महिन्यात दुसऱ्यांदा दरवाढ करावी लागली आहे. दुसरीकडे रुपया घसरल्याचा फायदा आयटी क्षेत्राला मिळणार आहे. रुपया घसरल्याने आयटी क्षेत्राची निर्यात वाढेल असे मानले जाते. मात्र, हा अपवाद वगळता रुपया घसरणे देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी चांगले लक्षण मानले जात नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारामन् लोकसभेत १ फेब्रुवारी रोजी आपल्या भाषणात यासंदर्भात कोणती उपयायोजना करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**दोन निवडणुका** : २०२५ मध्ये दिल्ली व बिहार या दोन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. दिल्लीची निवडणूक तर जवळ आली असून, येत्या काही दिवसांत निवडणूक आयोग दिल्ली निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची शक्यता आहे. दिल्ली विधानसभा जिंकण्याची किमया भाजपाला करावी लागणार आहे. दिल्ली राज्य ३२ वर्षांपूर्वी अस्तित्वात आले. पण १९९३ ची पहिली निवडणूक वगळता भाजपाला हे राज्य कधीही जिंकता आलेले नाही. मात्र, लोकसभेच्या जागा भाजपा जिंकत आला आहे. प्रथम काँग्रेसच्या शीला दीक्षित व आता आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभा निवडणूक जिंकण्याची जादू केली आहे. भाजपाने यावेळी विधानसभा निवडणूक जिंकण्याचा चंग बांधला असून तशी मोर्चेबांधणी चालविली आहे. काँग्रेस व आम आदमी पक्षात कोणताही निवडणूक समझोता होणार नसल्याने ही निवडणूक तिरंगी होणार हे ठरलेले आहे. याचा फायदा उठविण्याचा प्रयत्न भाजपा करणार आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे आम आदमी पक्षाची प्रतिमा डागाळली आहे. पक्ष नेत्यांचे मनोधैर्य खचलेले आहे. याचा फायदा भाजपाला मिळू शकतो, असे राजकीय निरीक्षकांना वाटत आहे तर दुसरीकडे आम आदमी पक्ष केजरीवाल-सिसोदिया यांच्या अटकेचा मुद्दा उपस्थित करून सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे असे दिसते.

**माजी खासदार मैदानात** : लोकसभा निवडणुकीत भाजपाने परवेश वर्मा, रमेश विधुरी व डॉ. हर्षवर्धन यांना उमेदवारी नाकारली होती. हे तिन्ही नेते दिग्गज मानले जातात. परवेश वर्मा हे माजी मुख्यमंत्री स्व. साहिबसिंग वर्मा यांचे सुपुत्र असून जाट समाजाचे नेते आहेत. त्यांना माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. रमेश विधुरी हे गुजर समाजाचे आहेत. दक्षिण दिल्लीतून लोकसभेवर निवडून जाणाऱ्या विधुरी यांना महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघातून उभे करण्यात आले आहे. माजी मंत्री मीनाक्षी लेखी यांनाही विधानसभा निवडणुकीत उभे केले जाण्याची शक्यता आहे. माजी आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन यांचाही उपयोग भाजपाला होऊ शकला असता; पण त्यांना निवडणुकीत उभे केले जाण्याची शक्यता नसल्याचे समजते. भाजपासाठी येणारी निवडणूक अटीतटीची असल्याने पक्ष पूर्ण ताकदीने निवडणुकीच्या मैदानात उतरेल, अशी चिन्हे आहेत.

**आणि बिहार** : २०२५ च्या अखेरीस बिहार विधानसभा निवडणूक होत आहे. तेथे नितीशकुमार यांचा जनता दल युनायटेड व भाजपा यांची युती विजयी होईल, असा आजचा अंदाज आहे. पण, बिहारचे जातीय समीकरण नेहमी धक्कादायक निकाल देत आले आहे. नितीशकुमार यांची मानसिक स्थिती हा एक चर्चेचा विषय झाला आहे. त्यांची मानसिक अवस्था एकदम ठीकठाक नसल्याचे समजते. सार्वजनिक कार्यक्रमात ते जे बोलतात, जसे वागतात याने त्यांच्या मानसिक स्थितीबाबत संभ्रम तयार केला आहे. दुर्दैवाने राज्यात भाजपाजवळही राज्याला सक्षम नेतृत्व देऊ शकणारा नेता नाही. माजी उपमुख्यमंत्री सुशीलकुमार मोदी यांची ती प्रतिमा तयार होत होती. मात्र, त्यांचे कर्करोगाने काहीसे अकस्मात निधन झाल्याने भाजपा नेतृत्वात एक प्रकारची पोकळी तयार झाली आहे.

**पुन्हा अनिश्चितता?** : बिहारमधील मागील काही दिवसातील घटनाक्रम पुन्हा अनिश्चिततेचा संकेत करणारा आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार असे विरोधाभासी संकेत का देत आहेत, हे त्यांनाच ठावूक असावे. यात त्यांची प्रतिमा व विश्वसनीयता कमजोर होत आहे. याची बहुधा त्यांना कल्पना नसावी. पण, या घटनाक्रमात फार तथ्य नसावे असे दिसते. त्याचा बिहार निवडणुकीवर परिणाम होण्याची शक्यताही नाही. आजच्या स्थितीत तरी बिहारची निवडणूक जनता दल युनायटेड-भाजपा युती निश्चितपणे जिंकेल, असे म्हणता येईल. अर्थात ही निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होणार आहे.

**अर्थसंकल्पाची तयारी** : राजधानी दिल्लीला कडाक्याच्या थंडीने गारठले असताना नॉर्थ ब्लॉकमध्ये नव्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू झाली आहे. अर्थसंकल्पावर शेवटचा हात फिरविला जात आहे. बाजारात काही प्रमाणात मंदीचे सावट आहे. हे दूर करण्यासाठी सामान्य ग्राहकांची क्रयशक्ती वाढविण्याची उपाययोजना सरकारकडून केली जाण्याची शक्यता आहे. त्याचाच एक भाग म्हणजे सामान्य नागरिकाला आयकरात सूट दिली जाण्याची चर्चा केली जात आहे. सामान्य नागरिकास आयकरात सूट दिल्यास यामुळे त्याच्या खिशात जो पैसा वाचेल त्याचा वापर तो बाजारात जाऊन खरेदीसाठी करील. स्वाभाविकच बाजारातील मागणी वाढेल. मागणी वाढल्याने उत्पादन वाढेल. हे चक्र वेगात फिरल्यास मंदीचे सावट काही प्रमाणात दूर होण्यास मदत होईल, असे अर्थतज्ज्ञांना वाटते. पंतप्रधान व अर्थमंत्री अर्थव्यवस्थेवर तसेच ढासळत्या रुपयावर कोणती उपाययोजना करतात याचे काही संकेत १ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात मिळतील.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# योद्धा संत गुरू गोविंदसिंह...

हिंदू धर्मरक्षक म्हणून इतिहासात नोंद असलेले शिखांचे दहावे गुरू गोविंदसिंह यांचा आजचा पौष शुक्ल सप्तमी हा ३५८ वा जयंती दिन. १६६६ मध्ये जन्मलेले योद्धा संत गुरू गोविंदसिंहांचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी अंकित आहे. न्याय आणि धर्मरक्षणार्थ शीख संप्रदायात त्यांनी १६९९ मध्ये खालसा पंथाची स्थापना केली. शीख गुरू परंपरेतील गोविंदसिंह हे दहावे आणि शेवटचे गुरू. शीख संप्रदायाचे पहिले गुरू नानक यांना सारे जाणतात. त्यानंतर गुरू अंगद, गुरू अमर, गुरू रामदास, गुरू अर्जुन, गुरू हरगोविंद, गुरू हरराय, गुरू हरकृष्ण, गुरू तेगबहादूर आणि गुरू गोविंदसिंह असे शिखांचे दहा गुरू आहेत. ही गुरू परंपरा दहावे गुरू गोविंदसिंह यांनी समाप्त केली. त्यांनी यानंतर ग्रंथ साहिबांनाच गुरू मानण्याचा आदेश शिखांना दिला. त्यानंतर 'गुरू ग्रंथसाहिब' ही ओळख निर्माण झाली. गुरू गोविंदसिंह यांनी आपले सर्वस्व अन्याय, अत्याचाराशी संघर्ष करून लोककल्याणासाठी खर्च केले. आपले वडील शिखांचे नववे गुरू तेगबहादूर यांचा बलिदान वारसा पुढे चालवून आपल्या चारही पुत्रांचे धर्मरक्षणासाठी बलिदान दिले. गुरू गोविंदसिंहांच्या अंतिमसमयी त्यांच्या अनुयायांनी आपल्यानंतर आमचे गुरू कोण? असे विचारले असता ते म्हणाले,

*आज्ञा हुई अकाल की, तबही चलाई यो पंथ*
*सब सिख्खन को हकूम है, गुरू मानियो ग्रंथ..*

यानुसार गुरू गोविंदसिंहांनी पवित्र अशा गुरू ग्रंथसाहिब या ग्रंथालाच यानंतर गुरू मानण्याचा आदेश दिला. त्यानुसार शिखांमधील गुरू परंपरा त्यावेळी गुरू गोविंदसिंह या दहाव्या गुरूंनी संपुष्टात आणली. तेव्हापासून गुरू ग्रंथसाहिबास आदर्श मानून खालसा पंथ आजही देश व धर्माचे रक्षण करीत आहे. वडिलांचे बलिदान, चार मुलांचे बलिदान, खालसा पंथाची स्थापना, शिखांमधील गुरू परंपरेऐवजी गुरू ग्रंथसाहिबाची योजना या साऱ्यांमुळे भारतीय इतिहासात गुरू गोविंदसिंहांचे नाव सुवर्णाक्षरांनी अंकित झाले आहे. शिखांमधील लढवय्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खालसा पंथाची स्थापना याच गुरू गोविंदसिंहांनी केली आहे. त्यांच्या काळातही सांप्रदायिक उन्माद जोरात होता. मोगलांचा राजाश्रय कट्टरपंथी मुसलमानांना मिळत असे. त्यांच्या वाढत्या अन्याय-अत्याचारांचा प्रतिकार करण्यासाठी १६९९ मध्ये बैसाखीच्या दिवशी गुरू गोविंदसिंहांनी खालसा पंथाची स्थापना केली. हा खालसा पंथ म्हणजे हिंदुत्वाचे रक्षण करण्यासाठी लढवय्या व शिस्तबद्ध सैनिकांची आघाडीच होती. खालसा पंथाच्या स्थापनेच्या घोषणा केल्यानंतर गुरू गोविंदसिंहांनी आता तुमच्यापैकी कोण बलिदानासाठी सज्ज आहे, अशी विचारणा केली. त्यावर एक युवक पुढे आला. तो होता दयासिंह. त्याला घेऊन गुरू बाजूच्याच राहुटीत गेले आणि थोड्या वेळाने रक्ताने माखलेली तलवार घेऊन बाहेर आले. पुन्हा प्रश्न विचारला, आता कोण येणार बलिदानासाठी...?

यानंतर आणखी एक शीख युवक पुढे आला. त्यालाही आत नेऊन गुरू रक्ताळलेली तलवार घेऊन बाहेर आले. बलिदानासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे आलेल्या आणखी तिघांना अशाच पद्धतीने त्यांनी आत नेले. समोरचा जमाव या साऱ्या प्रकाराने अतिशय हादरलेला आणि स्तब्ध झाला होता. अखेर गुरू गोविंदसिंहांनी या साऱ्या शांततेवर पडदा टाकला आणि त्या पाचही युवकांना बाहेर आणले. दयासिंहांनंतर बलिदानासाठी तयार झालेल्या धर्मसिंह, हिंमतसिंह, मोहकसिंह आणि साहबसिंह या पाचही युवकांना त्यांनी 'पंचप्यारे' म्हणून घोषित केले. हे पंचप्यारे शीख संप्रदायातील खालसा पंथाचे अविभाज्य घटक असून त्यांना शीख बांधव खूप मानतात. गुरू गोविंदसिंहांनी स्थापन केलेल्या खालसांना गणवेश किंवा नियम म्हणून पाच 'ककार' दिले. त्यात केस कधीच कापायचे नाहीत, लोखंडी कडे नेहमी परिधान करायचे, कंगवा लाकडी वापरायचा, कच्छा वापरायचा आणि कृपाण म्हणजे कट्यार परिधान करायची, हे त्यांच्यासाठी निर्देश होते. तेव्हापासून पंजाबमध्ये बैसाखीचा सण उत्साहाने साजरा होतो. गोविंदसिंहाचे वडील आणि शिखांचे नववे गुरू तेगबहादूर यांचा त्यावेळी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिला म्हणून मोगल बादशाह औरंगजेबाने शिरच्छेद केला होता. तर चार मुलांपैकी पहिला अजितसिंह व दुसरा झुंझारसिंह हे औरंगजेबाचा सेनापती वजीरखानसोबत लढताना हुतात्मा झाले होते. तर, याच वजीरखानने दोन्ही लहान मुले जोरावरसिंह व फतेहसिंह यांना भिंतीत गाडून टाकले होते. अशा चारही मुलांच्या बलिदानानंतरही गुरू गोविंदसिंह विचलित झाले नाहीत. चमकौरच्या लढाईत १० लाखांच्या मोगल सैन्यास फक्त ४२ खालसा वीरांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पिटाळून लावले होते. गुरू गोविंदसिंह म्हणत,

*चिडियों से मैं बाज लढाऊं*
*गिदडों को मैं शेर बनाऊं*
*सवा लाख से एक लडाऊं*
*तब गुरू गोविंदसिंह नाम कहाऊं...*

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# हेची फळ काय मम तपाला!

इंजिनीअरिंगला सतत नापास होणाऱ्या एका मुलाने आपल्या आई-वडिलांची हत्या केल्याची अत्यंत सुन्न करणारी बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली. हा मुलगा सातत्याने जवळपास सहा वर्षांपासून नापास होत होता. त्यामुळे त्याचे वडील त्याला सातत्याने 'तू इंजिनीअरिंग सोडून दे व दुसरा कोणता तरी अभ्यासक्रम कर' असे सांगत होते. आईसुद्धा त्याला 'काहीतरी कामधंदा कर' असे सांगत होती. परंतु मुलगा तो अभ्यासक्रम सोडायला तयार नव्हता. यावरून त्यांच्यामध्ये अनेक वेळा वादविवाद व्हायचे. शेवटी ते वादविवाद इतके वाढत गेले की, एक दिवस त्याने आपल्या आई-वडिलांना संपविण्याचा निर्णय घेतला. अपत्यप्राप्ती हा आई-वडिलांच्या जीवनातील कितीतरी मोठा आनंदाचा क्षण असतो. त्याचे लाड-कौतुक, त्याचे बालपण यामध्ये ते रमलेले असतात. ज्यांनी जन्म दिला, राहायला घर दिले, सर्व सोयी-सुविधा दिल्या, त्यांना संपवण्याचा निर्णय करणारा कपाळकरंटा ही याच सभ्य समाजाची निर्मिती आहे, हे स्वीकारायला मन तयार होत नाही.

बरेचदा आई-वडील मुलांवर आपल्या अपेक्षांचे ओझे लादतात, असे म्हटले जाते. आई-वडिलांना वाटते की, आमच्या जीवनात आम्ही चांगले शिक्षण घेतले नाही तर आमच्या मुलांनी तरी घेतले पाहिजे किंवा आम्ही चांगले शिक्षण घेतलेले आहे, आमची मुलंही चांगले उच्चशिक्षित झाले पाहिजे. या दोन्ही कारणांसाठी ते मुलांना चांगला अभ्यासक्रम निवडण्याचा आग्रह धरतात. त्यासाठी त्यांना महागडे शिकवणी वर्ग लावून देतात. लाखो रुपये शुल्क भरून चालणारे हे अभ्यासक्रम आणि त्यांचे दिवसभर चालणारे शिकवणी वर्ग त्यामुळे अनेक वेळा मुलांचा कोंडमारा होतो. मुलांना एक तर त्या विषयात रुची नसते किंवा जे शिकवलं जात आहे ते त्यांना कठीण वाटते किंवा सकाळी गेल्यापासून तर संध्याकाळपर्यंत चालणारे वर्ग हे चार-दोन दिवस त्यांना ठीक वाटतात, सुसह्य वाटतात; पण त्यानंतर त्यांना ते नकोसे होतात. एखादी गोष्ट नकोशी झाली की, मग काहीही झाले तरी ही गोष्ट मी करणार नाही, या निष्कर्षाप्रत ते येऊन पोहोचतात. त्यामुळे त्यांचे त्यांच्या पालकांनी ठेवलेल्या ध्येयावरून लक्ष दूर होऊन जाते. पैसे खर्च करून पालक त्यांचे काम करतात. ज्यांच्याकडे शिकवणी लावली जाते ते शिक्षक शिकवून त्यांचे काम करतात. परंतु ज्याला काही बनायचे आहे, ज्याने अभ्यास करायचा आहे त्याच्या मनात मात्र पूर्णतः नकार असतो. हा नकार पालकांच्या कधी लक्षातच येत नाही तर कधी थोडाबहुत लक्षात येतो, परंतु सर्वार्थाने तो निकाल लागल्यावरच लक्षात येतो. परंतु तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. मुलगा नापास झाला किंवा त्याला कमी गुण मिळाले यामध्ये पालकांमध्ये पराभवाची भावना निर्माण होते. त्यामुळे ते मुलावर आगपाखड करतात. माणसाचे मन हे प्रशंसेचे, कौतुकाचे पुरस्काराचे भुकेले असते. त्या मनाला अपमान नको असतो.

मुला-मुलींचे संगोपन आता हा कठीण मुद्दा झालेला आहे. पूर्वी समाजातील वातावरण असे होते की, आई-वडिलांच्या व्यतिरिक्त इतर नातेवाईकांचा, शेजाऱ्यांचा मुलांना धाक असायचा. परंतु संपूर्ण समाजाची अवस्था अशा पद्धतीची झाली आहे की, मुला-मुलींना कोणाचाही धाक राहिलेला नाही. 'खा, प्या आणि मजा करा' अशा पद्धतीचे वातावरण सर्वत्र निर्माण होताना दिसत आहे. त्यांना सुखसोयी पाहिजे आहेत, परंतु जबाबदारी व कर्तव्य नको. मुलांची परीक्षा आल्यावर त्यांच्या आई-वडिलांना त्या परीक्षेचा ताण असतो; परंतु ज्याची परीक्षा आहे तो मात्र आरामात असतो. त्यामुळे आई-वडिलांना त्याचे पुढे कसे होणार अशा पद्धतीची चिंता लागून राहिलेली असते. यातूनच मुलांच्या मागे लागणे हे घडत असते. परंतु आई-वडिलांनी वारंवार सांगूनही मुलामध्ये परिवर्तन होत नसेल तर आई-वडिलांनी समुपदेशकांची मदत घेणे आवश्यक आहे. अनेक वेळा आई-वडिलांच्या सूचना या कर्तव्यपूर्तीसाठी केलेल्या असतात. परंतु त्या सूचनांमुळे त्याच्यामध्ये बदल होत आहे की नाही, हे पाहिले जात नाही.

आई-वडिलांचा प्रचंड तिरस्कार करणारा मुलगा, त्यांना संपविण्याचा विचार करणारा मुलगा त्याची ही मानसिकता एका दिवसात निश्चितच निर्माण झाली नसेल. अनेक वर्षांपासून त्याच्या मनात याबद्दल राग निर्माण झाला असेल. त्या रागातून सातत्याने त्याच्या मनात आई-वडिलांबद्दल नकारात्मक विचार सुरू झाले असतील. अतिरेकी रागातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलले असेल. परंतु ही घटना दुर्मिळातील दुर्मिळ आहे. सर्वच मुले अशी नाहीत. अशा पद्धतीचा विचार कुठलाही मुलगा किंवा मुलगी करत नाही. परंतु तो मुलगा या थराला जातपर्यंत त्याच्या आई-वडिलांना कुठलीच शंका कशी आली नसेल हा एक मोठा प्रश्न आहे. आपली गोष्ट समोरच्याला आवडली नाही हे त्याच्या चेहऱ्यावरूनसुद्धा वाचता येते. अनेक वेळा पालक मुलाला अभ्यासक्रम पूर्ण कर, असे सांगत असतात. परंतु इथे तर त्याचे आई-वडील त्याला तुला जमत नसेल तर अभ्यासक्रम सोड असे सांगत होते; परंतु ही गोष्टही त्याला सहन होत नव्हती. त्यामुळे वाढत्या वयातील मुलांसोबत सकारात्मक संवाद गरजेचा आहे. छोट्या छोट्या अगदी सहज करण्याजोग्या गोष्टी सांगून आपलं म्हणणं तो ऐकतो आहे की नाही हे तपासणे गरजेचे आहे. मुलांच्या मित्राकडून तो आई-वडिलांबद्दल कसा विचार करतो, शिक्षकांबद्दल कसा विचार करतो हे माहीत करून घेणे गरजेचे आहे. एखाद्याचे विचार परिवर्तन करणे ही एक प्रक्रिया आहे. ती कधी एका दिवसात होऊ शकेल, कधी तिला अनेक दिवस लागू शकतील. ज्यांना परिवर्तन घडवून आणायचे आहे त्यांच्यामध्ये तेवढा संयम असणे गरजेचे आहे. ज्यांनी जन्म दिला, सर्व सुखसोयी दिल्या, शिक्षणासाठी पैसा खर्च केला; एवढे करूनही जर मुलांच्या मनात आत्मीयता निर्माण होत नसेल तर कुठे चुकते आहे याचा शोध घेणे गरजेचे आहे. जर हे लक्षात आले तर कुठे थांबावे हे सुज्ञ पालकांनी ठरविले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### नागपूर परिसरात निसर्गरम्य सहलीची संधी



नागपूरकरांना एक दिवसाची सहल करण्यासाठी मोहगाव झिल्पी येथील सिद्धिविनायक गणेश मंदिर, बोर धरण, केळझरचा गणपती व खिडकीचे हनुमान मंदिर व वर्धा रोडने नागपूरला परत येणे अशी छान, छोटी व पूर्णपणे समाधान देणारी सहल शक्य आहे. साधारणतः ९ वाजता नागपूरहून हिंगणा मार्गाने निघणे. १० वाजेपर्यंत आपण मोहगाव झिल्पी येथील सिद्धिविनायक गणेश मंदिरला सहज पोहचू शकतो. मंदिर हे झिल्पी तलावाच्या वरच्या भागात आहे. गणेश मंदिर, तलावातील पाणी व आजूबाजूला असलेल्या टेकड्या, भागवतांची झाडे पाहून मन प्रसन्न होते. सिद्धिविनायक गणेश मंदिर ट्रस्टने मंदिर परिसरात उत्तम स्वच्छता ठेवलेली आहे. याचे संपूर्ण श्रेय मनपाचे माजी महापौर संदीप जोशी यांना आहे. येथील सिद्धिविनायक गणेश मंदिरातील गणपतीचे दर्शन घेतले असता मन प्रसन्न होते. नंतर येथील उपाहारगृहात छान नाश्ता उपलब्ध आहे. तो घेऊन येथील फार्महाऊसमध्ये थोडा वेळ विश्रांती घेऊन मग आपण बोर धरणाला भेट देण्यासाठी निघू शकतो. बोर धरणाला साधारणतः बारा वाजता आपण पोहोचतो. १२ ते १ पर्यंत बोर धरण, धरणाच्या मागील पाणीसाठा, आजूबाजूची झाडे, पहाड सर्व दृश्य सुंदर दिसते. येथे महाराष्ट्र पर्यटनचे विश्रामगृह आहे. येथे छान जेवण आपणास मिळेल. यासाठी अगोदर आरक्षण करून घ्यावे लागेल. जेवण व थोडा आराम केल्यावर चहा घेऊन साधारणतः ३ वाजता केळझर येथील गणपतीच्या दर्शनाला आपण निघू शकतो. येथील आजूबाजूचा परिसर छान आहे. गणपतीच्या दर्शनानंतर वर्धा मार्गे नागपूरकडे प्रस्थान करावयाचे आहे. नागपूरला पोहोचण्यापूर्वी रस्तात खडकी येथील हनुमान मंदिर लागते. हनुमानाचे दर्शन घेऊन आपण नागपूरला संध्याकाळी ६ वाजेपर्यंत पोहचू शकतो. अशाप्रकारे नागपूरकरांसाठी एक दिवसाची सहल करणे शक्य आहे. या सहलीमुळे फार थकवा न येता, देवांचे दर्शन घडते व मनाला आनंद मिळतो.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

### दादागिरीविरहित राजकारण हे आता स्वप्नवतच

बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर महाराष्ट्रात सध्या या एकाच मुद्यावर समाजमाध्यमे, वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रांमार्फत जोरकसपणे चर्चा सुरू आहे. अर्थात त्या निमित्ताने देशातील अलिकडच्या काळातील राजकारणाचा स्तर किती खालावला आहे हे देखील जनतेला समजत आहे. राजकारणात निवडणूक जिंकण्यासाठी आणि आपापल्या कार्यक्षेत्रात दबदबा निर्माण करण्यासाठी आपले विश्वासू 'डॉन' पोसणे हे राजकीय पुढाऱ्यांना अपरिहार्यच आहे असे दिसते. त्यामुळेच वाल्मीक कराडसारखे डॉन निर्माण होतात आणि पोसले जातात. बरे हे वर्षानुवर्षे असूनही कुठलीच कारवाई होत नाही. असे कोण कोण अवांछित लोक आहेत हे सगळ्या शासकीय यंत्रणेला माहीत असते परंतु ते आमदार, मंत्री या लोकांच्या अरेरावी आणि यथोचित धमक्यांमुळे गप्प राहणेच पसंत करतात. वाल्मीक कराड जर वर्षानुवर्षे आपली दहशत निर्माण करून वावरतो तर आजपर्यंत त्याच्या काळ्या कृत्यांची चौकशी होऊन कारवाई का केली गेली नाही.

आता या प्रकरणात भविष्यात कुठलेही दडपण न येता यंत्रणा कारवाई करेल आणि जनताही वरील हत्या प्रकरण विसरेल हे निश्चितच. परंतु भविष्यातही राजकारणात असे गुंडपुंड राजकीय पुढाऱ्यांच्या पंखाखाली राहणारच हेही सत्य.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### नागपुरात धुळीचे साम्राज्य

सध्या नागपुरात फार मोठ्या प्रमाणात सिमेंट रस्ते आणि उड्डाणपुलांची कामे सुरू आहेत. त्यामुळे जिकडे बघावे तिकडे माती आणि धुळीचे साम्राज्य दिसून येते. याचा त्रास मुख्यत्वे दुचाकीचालकांना मोठ्या प्रमाणात होतो. जोपर्यंत ही सगळी कामे पूर्ण होत नाहीत तोपर्यंत हा त्रास सर्वांना सहन करावाच लागेल. परंतु जे सिमेंट रस्ते पूर्ण होतात आणि वाहतुकीसाठी



खुले केले जातात कमीतकमी ते तरी कंत्राटदारांनी स्वच्छ करून खुले केले पाहिजेत. परंतु कंत्राटदारांकडून हे होताना दिसत नाही. सिमेंट रस्ते तयार झाल्यावर त्यावरून वाहतूक सुरू होते तेव्हा सिमेंटची धूळ मोठ्या प्रमाणात उडते आणि दुचाकी चालक आणि पादचाऱ्यांना त्याचा खूप त्रास सहन करावा लागतो. काम पूर्ण न करणाऱ्या बेजबाबदार कंत्राटदारांवर कारवाई केली पाहिजे. या समस्येकडे कोण लक्ष देणार?

**संजीव हेडाऊ**/९३७०१६९५८२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### पोलिस दलाकडून वाहतुक नियमांबाबत जनजागृती मोहिम

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र पोलिस स्थापना दिनानिमित्त २ ते ८ जानेवारी दरम्यान महाराष्ट्र पोलिस दलातर्फे जनजागृतीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने जिल्हा पोलिस दलाच्यावतीनेही रविवार ५ जानेवारी रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली.

जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी व अप्पर पोलिस अधिक्षक यशवंत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथरी, सोनपेठ, पालम, बोरी, ताडकळस, चारठाणा पोलिस ठाण्याच्यावतीने आपापले हद्दीत महत्वाचे प्रवासी वाहतुकीच्या ठिकाणी व मुख्य चौकातात वाहन चालकांना वाहतूक नियमांबाबत माहिती देण्यात आली. त्यामध्ये चालकांनी सुरक्षित वाहन चालविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच मोटार सायकल चालवताना हेल्मेट व चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्ट वापरण्याचे महत्व समजावून सांगण्यात आले. मोटार वाहन कायद्यामध्ये असलेले नियम व तरतुदी या बाबत जनजागृती करण्यात आली. विशेषतः हेल्मेट घालून वाहन चालविणाऱ्या वाहनधारकांचे बोरी पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांवतीने पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. तर पोलीस स्टेशन चारठाणा यांनी प्रवासी ट्रक व इतर मोठे वाहनांना सुरक्षेकरिता पाठीमागून रेडीयम लावण्याचे महत्व सांगून काही वाहनाना रेडीयम लावण्यात आले.

दऱ्यान, या मोहिमेत पोलीस स्टेशन सोनपेठचे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोल्लमवाड, पालमचे पोलीस निरीक्षक थोरात, बोरीचे सपोनि गोपीनवर, पाथरी सपोनि शिवस्वामी, ताडकळस सपोनि मोरे व चारठाणा पोलिस स्टेशनचे सपोनि अंधारे साहेब यांच्यासह संबंधित पोस्टेच्या अंमलदारांनी सहभाग घेतला.

### जिंतूरजवळ कार उलटून सहा प्रवाशी जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर ते छत्रपती संभाजीनगर या महामार्गावर पिंपरी गीते शिवारात मारोती सुजूकी कंपनीची व्हॅगेनर ही कार उलटल्याने त्यातील सहा प्रवाशी जखमी झाले.

शिर्डी येथून हे सहाजण या कारद्वारे रविवारी रात्री औंढा नागनाथकडे जात होते. रात्री १०.३० वाजेच्या सुमारास पिंपरी गीते शिवारात कार चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या बाजूला जावून उलटली. त्या सहा प्रवाशी जखमी झाले. या महामार्गावरुन जाणाऱ्या काही वाहनधारकांनी तात्काळ या जखमींना बाहेर काढून जिंतूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथून प्राथमिक उपचार करुन त्यातील गंभीर जखमींना परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. जखमींमध्ये काही मुलांचा समावेश आहे.

### चित्रकला मानवी अभिव्यक्तीचे उत्तम साधन- डॉ.विवेक नावंदर

**मानवत,/प्रतिनिधी :** कलेच्या क्षेत्रात होणारे वैविध्यपूर्ण बदल पाहता व 'ए आय' या आधुनिक तंत्रासह अभिव्यक्त होण्यासाठी महत्वाचे साधन म्हणून पाहताना चित्रकलेला महत्वाचे स्थान प्रत्येकाने आपल्या आयुष्यात दिले पाहिजे, असे मत बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विवेक नावंदर यांनी व्यक्त केले. बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे प्रेरणास्थान स्व.डॉ. पांडुरंगजी नावंदर (बाबुजी) यांच्या जन्मदिनानिमित्त भव्य चित्रकला स्पर्धा बाल विद्याविहार प्रशाला अंबिका नगर येथे आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे दीपप्रज्वलन व चित्रकलेच्या विषय फलकाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विविध शाळातील ५०० विद्यार्थ्यांनी आपल्या कलात्मक विचारांवर आधारित विषयाला अनुसरून चित्राचे रेखाटन केले. या चित्रकला स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून डॉ. एन. ए. झरकर,उद्घाटक म्हणून डॉ.विवेक नावंदर, तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विलास पोंहडूळकर, कोषाध्यक्ष विनय नावंदर तसेच सदस्य पवनकुमार झांजरी, ॲड. अशोक सोनी, डॉ. अनिता नावंदर, मल्हार विहीटकर, बाल विद्यामंदिर हायस्कूलचे मुख्याध्यापक अरुण बोराडे, उपमुख्याध्यापक आर. जी. तुम्मेवार, सौ. सिंधू शर्मा, बाल विद्याविहार प्रशालेचे मुख्याध्यापक विनायक लोखंडे, कलाशिक्षक केशव लगड, सौ. निर्मला सोडेगावकर, संगीत शिक्षक रमाकांत पैंजणे व या चित्रकला स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लाभलेले प्रा. डॉ. सूर्यकांत जाधव व प्रा. नारायण वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

### योजना घरत यांना कै.सौ.कमलताई जामकर दर्पण पुरस्कार जाहिर

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील कै. सौ. कमलताई जामकर यांच्या स्मृतिप्रीत्यार्थ देण्यात येणारा यावर्षीचा 'दर्पण पुरस्कार' मुंबई येथील स्मित फाउंडेशनच्या संस्थापिका तथा निराधार, मनोरुग्णांची आई योजना घरत या समाजसेविकेला जाहीर करण्यात आला आहे.

योजना घरत यांचे निराधार वृध्द, मनोरुग्णं यांच्यासाठीचे सेवाकार्य मोलाचं असं आहे. स्वतः मदर तेरेसा यांच्या अनाथ आश्रमात वाढलेल्या योजना ताई या निराधार व मनोरुग्णांसाठी कार्य करीत आहेत. महिला सक्षमीकरण, कुष्ठरोग्यांची सेवा, विशेष मूल व त्याची काळजी, निराधारांसाठी मागील २८ वर्षापासून सातत्यापूर्ण योजना ताईंचे कार्य सुरू आहे. सन २०१७ साली मुंबई येथे स्मित फाउंडेशनची स्थापना केली.

दरम्यान, या पुरस्काराचे हे २२ वे वर्ष असून या पुर्वी साहित्यिक रेखा बैजल, डॉ. वृषाली किन्हाळकर, डॉ. मेबल आरोळे, अनाथांची माता सिंधुताई सपकाळ, राणी बंग, डॉ हेमलता पाटील, ॲड. सुरेखा दळवी, कु. नसीमा महुरजूक, सौ. वैशाली पाटील, सौ. प्रतिभा शिंदे, प्रा. साधना झाडबुके, डॉ. मंदाताई आमटे, श्रीमती मायाताई सोरटे, श्रीमती रेहमतबी करीम बेग मिर्झा, श्रीमती सुमनसिंह चौहान व श्रीमती मिठू देवी, सुलोचना कडू, श्रीमती अनुराधा कोईराला, डॉ. जोत्स्ना कुकडे., श्रीमती पिंजारीबाई उल्या पावरा, पद्मश्री राहीबाई सोमाजी पोपेरे, सौ. सुशीला विठ्ठलराव साबळे यांना प्रदान करण्यात आला.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा टिप्परचा सुळसुळाट

## कारवाई ही केवळ ट्रॅक्टर पुरतीच नावालाच

**पाथरी ,/प्रतिनिधी:-** पाथरी तालुक्यामध्ये गोदावरी नदीचे पात्र मोठे असल्याने पाथरी तालुका हा परभणी जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा करणारा तालुका म्हणून ओळखला जातो. त्यातच पुन्हा गोदावरी नदी पात्रातील पाणी ओसरु लागल्याने वाळू उपसा सुरू झाला आहे याकडे मात्र पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाकडून डोळे झाक होताना दिसत आहे.

सविस्तर बातमी अशी की पाथरी तालुक्यामध्ये नाथरा ते मुद्गल असे मोठे गोदावरी पात्र असताना मागच्या वर्षी शेकडो ब्रास वाळूची अवैध वाहतूक उपसा झाला परंतु या अवैध वाळू उपसा करणारे व अवैध वाहतूक करणाऱ्या प्रशासनाने व पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई न केल्याने यावर्षी परत पावसाळा संपल्यानंतर गोदावरी नदीकाठच्या गोंडगाव उमरा येथून मागील पंधरा दिवसापासून केणीच्या व तराफ्याच्या साह्याने शेकडो ब्रास वाळू उपसा करून रात्रीच्या वेळी बिन बोभाटपणे गोंडगाव-उमरा-लोणी-बाबुलतार मार्गे पाथरी व मानवत येथे खुल्याआम कालबाह्य झालेल्या हायवा टिप्पर व ट्रकच्या साह्याने वाळूची वाहतूक चालू असताना पोलीस प्रशासन अथवा महसूल प्रशासनाकडून सदरील वाहनांवर कारवाई होताना मात्र दिसून येत नाही.

### रस्त्यावर जागोजाग खबऱ्यांच्या टोळ्या बसलेल्याच

**रात्रीच्या वेळी पाथरी तालुक्यात गोंडगाव उमरा येथून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूचा उपसा करून कालबाह्य झालेल्या वाहनाच्या मार्फत अवैध वाहतूक चालते. या वाहनांवर कारवाई होऊ नये म्हणून प्रशासन किंवा पोलीस पथक यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी हर्षवर्धन पेट्रोल पंप च्या बाजूस असलेल्या सोनपेठ फाट्यावर तुरा फाट्यावर बाबळगाव फाट्यावर आणि पोखरणी फाट्यावर वाळू माफियांचे खबऱ्यांच्या मोठमोठ्या टोळ्या गस्तीवर असतात यावरही पोलीस प्रशासनाने करडी नजर ठेवून या खबऱ्यां वर कायदेशीर रित्या कठोर कारवाई करावी अशी मागणी सामान्य जनतेतून होताना दिसून येत आहे.**



यामुळे नागरिकातून सदरील वाळूमाफियांकडून पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनास हप्ते चालू असल्याचे बोलले जात असून त्यामुळेच रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर खुल्या अवैध वाळू उपसा करणारे वाहने चालू असताना पहावयास मिळत आहेत याकडे जिल्हा महसूल प्रशासन व जिल्हा पोलीस अधीक्षकांनी लक्ष देऊन सदरील अवैध वाळू उपसा अवैध वाहतूक वाहनावर ठोस कारवाई करण्याची गरज दिसून येत आहे.




जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघातील मौजे बेलुरा येथे भाजप सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात आले. यावेळी गोविंद थिटे पाटील रवी रणबावळे अजित भोंबे पाटील सचिन आडे अशोक खूपसे,दशरथ ज्ञानेश्वर निर्मळ, मंगेश ताठे, बाबासाहेब काकडे, ज्ञानेश्वर खूपसे अविनाश ताठे, नरेश ताठे, परमेश्वर खूपसे, सुभाष काकडे, बिबीषण राठोड, लक्ष्मण राठोड, बाबासाहेब अमोल काकडे, बचाटे, नागेश बचाटे, भगवान बचाटे, रमेश राठोड, महादेव खूपसे (दुकानदार) उद्धव ताठे, आदित्या खूपसे, अनिल खूपसे, ओंकार खूपसे, पांडुरंग खुपसे, विजय खुपसे, जीवन ताठे, तुकाराम राठोड, प्रकाश राठोड दिसत आहेत.

### श्री रंगनाथ महाराज यांची जयंती विविध उपक्रमांतून साजरी



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ येथील श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठानच्या माध्यमातून एका चांगल्या उपक्रमाने नवीन वर्षाची सुरुवात करण्यात आली. बुधवार दि.१ जानेवारी रोजी श्री रंगनाथ महाराज यांच्या ५५ व्या पुण्यतिथी निमित्ताने, रंजल्या गांजलेल्या बालकांची सेवा करण्याचा वसा घेतलेल्या बीड जिल्ह्यातील आनंदग्राम आणि शांतीवन येथील आश्रमातील मुलांना भेट देऊन एक दिवस त्यांच्या सहवासात राहून घालवला. यावेळी सोबत प्रतिष्ठानचे कार्यकर्ते व सोनपेठ येथील पत्रकार आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

यावेळी बीड जिल्ह्यातील पाली येथील आनंदग्राम या एचआयव्ही संक्रमित मुलांच्या आश्रमास भेट देऊन मुलांना फळे, ब्लँकेट वाटप करण्यात आले. आणि आनंदग्राम चे संस्थापक श्री दत्ता बारगजे यांची सपतीक सदिच्छा भेट घेतली आणि त्यांच्या कार्याची प्रशंसा करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच पूजा रेडीमेड सोनपेठ यांच्यावतीने आनंदग्राम येथील बालकांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर बीड जिल्ह्यातील आर्वी येथील श्री दीपक नागरगोजे यांनी सुरू केलेल्या शांतीवन या अनाथ आश्रमात जाऊन तेथील विद्यार्थ्यांना फळे व उबदार ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. तसेच आश्रमातील ० ते १ वर्षे वयाच्या बालकांना दुग्ध जन्य डब्बे देण्यात आले.तसेच संस्थापक श्री दिपक नागरगोजे यांचा सपतीक सदिच्छा सन्मान करुन त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. दोन्ही आश्रमातील बालका सोबत संपूर्ण दिवस घालवताना एकीकडे आनंद वाटत आसला तरी दुसरीकडे त्यांच्या अयुष्यासोबत नियतीने मांडलेल्या क्रुर पनाच्या दुःखाने नकळत सर्वांचेच डोळे ही पानावले असल्याचे सांगितले. यावेळी सोबत श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठान चे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते,भारत राष्ट्र समितीचे महाराष्ट्र समन्वयक सुधीर बिंदू, जय भवानी मित्र मंडळाचे अध्यक्ष बळीराम काटे, सोनपेठ तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबासाहेब गर्जे, पत्रकार राधेश्याम वर्मा, सोमनाथ नागुरे, सुभाष सावंत, महादेव नरवटे हे उपस्थित होते.





### पूर्णेत डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी व स्व.प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णेत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी व स्व. प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील लोककल्याण नागरी सहकारी पतसंस्था व मराठवाडा युवक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ०६ जानेवारी ते ०८ जानेवारी दरम्यान डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी व स्व. प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले आहे.

अभिनव विद्या विहार शाळेच्या प्रांगणात संपन्न होणाऱ्या या व्याख्यान मालेत सौ.डॉ. योगितताई तौर, भरत अमदापुरे, प्रा. दीपक कासरालीकर यांचे व्याख्यान होणार आहेत. सायंकाळी साडे सहा वाजता दररोज कार्यक्रमास सुरुवात होणार असून महिलासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नितीन चषक क्रिकेट स्पर्धेच्या खेळपट्टीचे उद्घाटन

**सेलू,/प्रतिनिधी-** नितीन व्यायामशाळा कला क्रीडा सांस्कृतिक युवक मंडळ द्वारा आयोजित स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त दरवर्षी होणाऱ्या नितीन चषक सेलू २०२५ क्रिकेट स्पर्धेचा भुमीपुजन सोहळा रविवार दि. पाच जानेवारी रोजी नुतन महाविद्यालयाच्या क्रिडांगनवर माजी आमदार हरिभाऊ लहाने यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी माजी आमदार हरिभाऊ लहाने, पवन आडळकर, डॉ अशोक नाईकनवरे, डॉ बाळासाहेब जाधव, डॉ ज्ञानेश्वर कार्टे, पत्रकार नारायण पाटील, संदीप लहाने, एड शिवाजी चौरे, दत्तात्रय सोळंके, पारस काला, राम सोनवणे, राजेश ढगे, मोहन बोराडे, संजय मुंडे, शिवाजी आकात, शिवसेना तालुकाप्रमुख बाबा काटकर, हनुमान गात, अविनाश शेरे, विनोद तरटे, अनिल डख, गणेश माळवे आदी मान्यवरांसह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या क्रिकेट स्पर्धेचे हे रोप्य महोत्सवी वर्ष साजरे होत असून



या स्पर्धेमध्ये मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून क्रिकेट संघ सहभागी होणार आहेत. मराठवाड्यातील आठ तर बाहेरील आठ नामवंत संघाचा समावेश राहणार आहे. केवळ ग्रामीण भागातील खेळाडूंना आपल्यातील कलागुणांना वाव देता यावा व तालुक्यातील क्रीडा प्रेमींना चांगल्या स्पर्धा पहावयास मिळाव्यात हा या स्पर्धा सुरू करण्यामागील उद्देश होता. यासाठी सर्वांनी बहुमोल असे सहकार्य केल्यामुळेच गेल्या पंचवीस वर्षापासून या स्पर्धेचे सातत्य त्याच उत्साहात टिकून आहे असे प्रतिपादन शिवसेनेचे माजी आमदार हरिभाऊ लहाने यांनी उद्घाटनप्रसंगी केले.

१५ ते २३ जानेवारी यादरम्यान या स्पर्धा संपन्न होणार असून अनेक मान्यवर यामध्ये उपस्थित असणार आहेत. रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त पारितोषकांची रक्कम यावेळी वाढवण्यात आली असून प्रथम पारितोषिक दोन लाख रुपये व चषक, द्वितीय पारितोषक एक लाख रुपये व चषक ठेवण्यात आलेले आहे. तसेच मालिकावीर म्हणून २१ हजार रुपयांचे पारितोषक राहणार आहे. दररोज मॅन ऑफ द मॅच, बेस्ट बॉलर, बेस्ट बॅट्समन, बेस्ट क्षेत्ररक्षक अशी विविध बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. यावर्षी स्पर्धेत विशेष पारितोषक प्रेक्षकांसाठी ठेवण्यात आले असून दररोज एका प्रेक्षकाला एक सायकल दिली जाणार आहे खेळाडूंना पारितोषिके सर्वच ठिकाणी दिली जातात परंतु प्रेक्षकांना पारितोषक देणारी राज्यातील ही पहिलीच क्रिकेट स्पर्धा ठरणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आव्हान यावेळी करण्यात आले.

## राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिला प्रभावीपणे राबवणार- आगार व्यवस्थापक चव्हाण

### एसटी आगारात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा मोहिमेची जनजागृती सुरु



**जिंतूर ,/प्रतिनिधी-** राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना प्रभावीपणे राबवणार असल्याचे मत आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांनी व्यक्त केले. ते जिंतूर एसटी आगारात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना मोहीम निमित्त कार्यक्रमात बोलत होते.या निमित्त मोठ्या प्रमाणात जनजागृती करत राबविण्यात येत असून या निमित्त जिंतूर आगारातील विशेषता प्रत्येक चालक वर्गास सुरक्षितता बाबत योग्य त्या सूचना मार्गदर्शन व प्रबोधन स्थानिक आगार प्रशासनाकडून केले जात आहे.

या वेळी आगाराच्या दर्शनी भागात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना बाबत बॅनर लावण्यात आले.नुकतेच आगारात प्रवाशी मित्र संघटनेचे तालूका अध्यक्ष सचिन रायपत्रेवार यांच्या प्रमुख उपस्थितीत व आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेत सदरील राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना कार्यक्रम प्रभावीपणे राबवत असतांना आगार व्यवस्थापक यांच्या तर्फे चालक वर्गाचे प्रबोधन केल्या जात आहे. चालक बांधवानी वेगावर नियंत्रन ठेवणे,मार्गस्थ होतांना रस्त्याच्या बाजूने लावलेल्या फलकाच्या सूचनेचे काटेकोरपणे पालन करणे,सायंकाळी,व पहाटे गाडीचे दिवे चालू ठेवणे,लांब पल्ल्याच्या वाहनांनी नियमित गाडीची तपासणी करून टायर, ब्रेक आरसे,दिवे यान यांचे निरीक्षण करणे,हायवे वर मार्गस्थ होतांना सतत वेळोवेळी लेन बदलू नये,योग्यवेळी निरीक्षण करून लेन बदलावी,वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करावे,गाडी चालवताना मोबाईलवर बोलणे टाळून धूम्रपान, मद्यप्राशन करून वाहन चालवू नये,डाव्या उजव्या बाजूला वळताना इंडिकेटरचा आवर्जून वापर करावा.व अन्य चालकासा सोबत संयमाने वागावे अश्या मार्गदर्शक सूचना करत आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांनी चालक वर्गाने प्रबोधन केले.ही मोहीम १ जानेवारी ते ३० जानेवारी पर्यत राबवण्यात येणार आहे.

या वेळी स्थानक प्रमुख आर. एस. सोनुने, वरिष्ठ लिपिक प्रल्हाद मुंढे, वाहन परीक्षक संजीव भांबळे, सचिन रायपत्रेवार, लिपिक गुणीरत वाकोडे, एन. एम. जाधव, सुरक्षा रक्षक सय्यद समी व बहुसंख्य चालक वर्ग उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हा माहिती कार्यालयात मराठी पत्रकार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**

बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित दर्पण दिन अर्थात मराठी पत्रकार दिनाचा कार्यक्रम काल सोमवारी कार्यालयात पत्रकारांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात दर्पण दिनानिमित्त दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने कार्यालयाला श्री बाळशास्त्री जांभेकर यांची एक प्रतिमा भेट देण्यात आली मराठी पत्रकार परिषदेचे राजेंद्र होळकर तसेच विलास डोळसे यांनीही प्रतिमा जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांना प्रदान केली.

येणाऱ्या काळात पत्रकारांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टिकोनातून विविध प्रकारच्या योजनांचे अर्ज आणि इतर बाबींवर यावेळी जिल्हा माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. येणाऱ्या काळात पत्रकारांची आरोग्य तपासणी करणे तसेच त्यांच्या रक्तगट नोंदवही चे काम करणे आदीबाबतही यावेळी चर्चा झाली.

यावेळी पत्रकार सुनिल क्षीरसागर, संपादक वैभव स्वामी, विलास डोळसे, साहस आदोडे, श्रीकांत कुलकर्णी,



अविनाश कुलकर्णी, संजय हंगे, मंगेश निटूरकर, सुभाष चौरे,विशाल सोळंके, प्रचंड सोळंके, राजेंद्र होळकर, शेखरकुमार, श्रीमती आयशा शेख सर्जेराव देशमुख, श्री. जाधव, सतीश केजकर, छायाचित्रकार लक्ष्मन नरनाळे, लक्ष्मन गायकवाड इत्यादी पत्रकार, छायाचित्रकार उपस्थित होते.जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी वरिष्ठ लिपिक श्रीमती बी.जी. अंबिलवादे, सहाय्यक छायाचित्रकार, एकनाथ मुजमुले, लिपिक टंकलेखक श्रीमती रेवती लाबडे, लिपिक टंकलेखक सावता गुंजाळ, वाहन चालक, दिपक पवार, शिपाई छगन कांडेकर. आदींची देखील या कार्यक्रमास उपस्थिती होती.

# भाजप सदस्य नोंदणी अभियानास बीडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**

भाजपाच्या वतीने आज बीड शहरातील बाजारतळ परिसरात सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री माननीय पंकजाताई मुंडे यांच्या आदेशावरून आणि बीडच्या माजी खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे तसेच जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा संयोजक नवनाथ अण्णा शिराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अभियान राबविण्यात आले*.

*याप्रसंगी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अजय सवाई, वैद्यकीय आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉक्टर अभय वनवे, मीराताई गांधले, गणेश पुजारी, शांतिनाथ डोरले, फारुक शेख, संदीप उबाळे, लताताई राऊत, भूषण पवार , देवाभाऊ नलावडे, राजू शहाणे, संतोष गवळी, नरेश पवार, विष्णुदास सुरवसे, बाबुराव परळकर, राजेश चरखा, संतोष थोरात, चंद्रकांत मुळे, ऍडव्होकेट गोविंद शिराळे,आदी पदाधिकारी उपस्थित होते. या अभियानास बीड शहरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला*.

# बुथप्रमुखांनी घरोघरी जाऊन जास्तीत जास्त भाजपा सदस्य नोदंणी करून घ्यावी–मा.आ.लक्ष्मण पवार

**शहरासह सर्कल मधील बुथवर २०० भाजपा सदस्यांची नोदंणी करण्याचे उद्दिष्ट**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात भाजपा सदस्य आभियाण सुरु आहे तरी मतदारसंघातील प्रत्येक बुथवर जाऊन जास्तीत जास्त सदस्य नोदंणी नोदणी करण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन मा.आ.लक्ष्मण पवार यांनी केले आहे

आज गेवराई येथील मा.आ.लक्ष्मण पवार यांच्या कोल्हेररोड वरील भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे भारतीय जनता पार्टी २२८-गेवराई विधानसभा जिल्हा बीड.भाजपा सदस्य अभियानास सुरुवात झाली यावेळी विधानसभा निवडणूक प्रमुख मा.शाम आबा कुंड नगराध्यक्ष सुशील



भाऊ जंजाळ, उपनगराध्यक्ष राजेंद्र दादा राक्षभुवनकर ,भगवान घुबार्डे,राहुल खंडागळे,याहीया खॉन, दादासाहेब गिरी,अनिल पौळ, भरत गायकवाड,अँड.सुरेश पवार, संजय इगळे,समाधान मस्के, अमोल मस्के,राम पवार, रामप्रसाद आहेर,लक्ष्मण चव्हाण,धनवडे मामा, चेअरमन गंगाधर, श्रिराम घाटुळ,मतिन कुरेशी, बबन राठोड, बाबा खरात, आदी उपस्थित होते

शक्ती प्रमुख बुथ प्रमुख नगरसेवक सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व भारतीय जनता पार्टी सर्व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

गेवराई मतदार संघाच्या प्रत्येक सर्कल गावामध्ये भाजप सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात करण्याचे नियोजन जबाबदारीची नियुक्ती करण्यात आली.

भाजपचे सदस्य होण्याकरिता-८८०००२०२४

या क्रमांकावर मिस्ड कॉल द्या आणि भाजपचे सदस्य व्हावे असे आवाहन मा.लक्ष्मण पवार यांनी केले आहे

यावेळी मतदारसंघातील ४०७ बुथ आहेत तर सर्व बुथप्रमुखांना एक बुथवर किमान २०० सदस्यांची नोदंणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे तरी शहरांसह मतदार संघातील बुथप्रमुखांनी घरोरी जाऊन जास्तीत जास्त सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे

# सराईत आरोपीकडून एक गावठी पिस्टल व काडतुस जप्त करुन दोन आरोपी केले जेरबंद

**स्थानिक गुन्हे शाखाने केज हद्दीतील लहुरी येथे केली कारवाई**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**

नवनीत कॉंवत पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या विरुध्द कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध अग्निशस्त्राची गोपनिय माहिती काढणेबाबत अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. त्यावरुन दिनांक ०६/०१/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोह/ जफर पठाण यांना गुप्त बातमी मिळाली की, इसम नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लहुरी ता.केज याचेकडे एक गावठी कट्टा असून तो लहुरी येथे जिल्हा परिषद शाळा जवळ थांबला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळताच सदरची खबर पो.नि. श्री. उस्मान शेख यांना देवुन त्यांनी पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पोह पठाण यांना दिले. त्यावरुन पोह पठाण यांनी सोबत स्थागुशा स्टाफ यांना घेवुन बातमी ठिकाणी जावुन सापळा लावला व लहुरी येथुन इसम नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लाहुरी ता.केज हा यास ताब्यात घेवुन त्याचे जवळ कमरेला एक गावठी बनावटीची पिस्टल व दोन जिवंत काडतुस बेकायदेशीररित्या मिळुन आले. सदर आरोपीकडे अधिक चौकशी करता त्याने सदर गावठी पिस्टल विकास सुभाष सावंत रा.सावंतवाडी ता.केज जि.बीड याचेकडुन आणल्याने सांगितले त्यानंतर सुभाष सावंतचा शोध घेवुन त्यास सावंतवाडी येथुन ताब्यात घेतले आहे.

आरोपीकडुन जप्त केलेला एक गावठी बनावटीची पिस्टल व दोन जिवंत काडतुस कि.अ.४२०००/- रु चा मुद्देमाल व वर नमुद दोन्ही आरोपी पो.स्टे.केज यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांचे विरुध्द पो.स्टे.केज येथे भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. नमुद दोन्ही आरोपींनी यापुर्वी पो.स्टे.केज, वडवणी ,युसुफ वडगाव, कळंब येथे पेट्रोलपंपावर कोयत्याचा धाक दाखवुन दहशत निर्माण करुन जबरी चोरीचे गुन्हे केले होते, स्थानिक गुन्हे शाखा,बीड ने या कोयता गँगचा पर्दाफाश करुन ०५ जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले होते. सदर आरोपींचा गुन्हे अभिलेख पाहता आरोपी १) विकास सुभाष सावंत रा.सावंतवाडी ता.केज याचेवर पुणे जिल्हया पो.स्टे.भारती विद्यापिठ (पुणे) येथे दरोडयाची तयारी ०१, मारहाणीचा ०१, पो.स्टे.सिंहगड (पुणे) येथे चोरीचा ०१ व अग्निशस्त्र बाळलेला ०१ गुन्हा तसेच बीड जिल्हयात कोयत्याचा धाक दाखवुन जबरी चोरीचे ०३ व धाराशिव जिल्हयात ०२ असे गुन्हे दाखल आहेत. आरोपी नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लहुरी ता.केज याचे वरील बीड जिल्हयात कोयत्याचा धाक दाखवुन जबरी चोरी करणेचे ०३ व धाराशिव जिल्हयात ०२ गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी मा.श्री. नवनीत कॉंवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोह/जफर पठाण, महेश जोगदंड, तुषार गायकवाड, बप्पासाहेब घोडके , चालक गणेश मराडे यांनी मिळुन केली आहे.

# ज्ञानराधा व राजस्थानीच्या ठेवी परत मिळण्यासाठी अंबाजोगाई येथे १ जानेवारीपासून साखळी उपोषण सुरू

## मागण्या मान्य न झाल्यास ९ जानेवारीपासून आत्महत्या करण्याचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ जानेवारी**

ज्ञानराधा व राजस्थानी मल्टीस्टेटच्या ठेवी परत मिळवण्यासाठी अंबाजोगाई येथे १ जानेवारी पासून साखळी उपोषण सुरू केले असून दररोज ४० ते ५० ठेवीदार उपोषणास बसत आहेत दरम्यान लवकरात लवकर मागण्या मान्य न झाल्यास ९ जानेवारी पासून आत्महत्या करण्याचा इशारा ठेवीदार कृती समितीचे अध्यक्ष लक्ष्मण गोरे यांनी दिला आहे.

अंबाजोगाई ठेवीदार कृती समिती यांच्याकडून ३ डिसेंबर २४ च्या निवेदनानुसार ठेवी परत मिळाव्या या प्रमुख मागणी सह ३४ मागण्या बाबत निवेदन देण्यात आले होते. या निवेदनावर कारवाई न झाल्याने सर्व ठेवीदारांनी कृती समितीचे अध्यक्ष लक्ष्मणराव गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली

१ जानेवारी २०२५ पासून उपजिल्हाधिकारी कार्यालया समोर साखळी उपोषणास प्रारंभ केला असून आज उपोषणाचा सहावा दिवस आहे.

ठेवीदारांनी आपल्या ठेवी परत मिळवण्यासाठी ज्या ३४ मागण्याचे निवेदन दिलेले आहे या मध्ये प्रामुख्याने १)बट्स कायद्याचा गुन्ह्यात समावेश करावा.

२) ठेवीदारांच्या ठेवी तात्काळ देण्यात याव्यात

३) शासनाने ठेवी साठी अर्थसंकल्पात तरतूद करून ठेवी तात्काळ द्याव्यात

४) ज्ञानराधा व राजस्थानी चे संचालक यांना तात्काळ अटक करावे.

५) एम पी आय डी चा प्रस्ताव शासनास तात्काळ पाठवावा

६) ज्ञानराधा व राजस्थानी चा तपास ई डी कडे देण्यात यावा

७) दोन्ही सोसायटीचे फॉरेन्सिक ऑडिट करावे

८) जप्त केलेल्या प्रॉपर्टीज ठेवीदारांच्या नावे जोडण्यात याव्यात

९) दोन्ही सोसायटीवर तज्ञ लेखापरीक्षक नेमावेत

१०) दोन्ही सोसायटीच्या जप्त प्रॉपर्टीज गॅझेट द्वारे प्रसिद्ध करून लिलाव करावा

११) ज्ञानराधा व राजस्थानी च्या तपासात दिशाभूल करणाऱ्यांना सह आरोपी करावे

१२) मिळून न आलेल्या आरोपींना फरारी घोषित करण्यात यावे

१३) ज्ञानराधा व राजस्थानी साठी सहारासारखे रिफंन्ड पोर्टल तयार करावे

१४) अध्यक्ष व संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्ता जप्त करून लिलाव करावा

१५) सर्व संचालकांचे पासपोर्ट जप्त करण्यात यावेत

१६) जप्त केलेल्या प्रॉपर्टीची चोरी झालेल्या ठिकाणी पोलिसात गुन्हा नोंद करावा

१७) आरोपीचे फोन सी डी आर द्वारे त्यांना अटक करावी १८) तात्काळ निर्णयासाठी प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवावे या व इतर मागण्याचा समावेश आहे. गेल्या सहा दिवसापासून उपोषणा चाळीस ते पन्नास ठेवीदार दररोज बसत असून मागण्या मान्य न झाल्यास दिनांक ९.१. २०२५ पासून आत्महत्या करण्याचा इशाराही निवेदनात दिलेला आहे.

# श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात दर्पण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ जानेवारी**



दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या २१३ व्या जयंती निमित्त येथील श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात बाळशास्त्री जांभेकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे उपस्थित होते. तर व्यासपीठावर जेष्ठ पत्रकार रमाकांत पाटील,शिवकुमार निर्मळे,अविनाश मुडेगांवकर,मुख्याध्यापक बाबुराव आडे,उपमुख्याध्यापक विवेक जोशी उपस्थित होते.

यावेळी प्रतिनिधी स्वरूपात उपस्थित पत्रकार बांधवांचे शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला.यावेळी प्रशांत बर्दापूरकर,दिलीप अडसूळ, राहुल देशपांडे,प्रशांत लाटकर, परमेश्वर गिते,ज्ञानेश मातेकर,गजानन मुडेगांवकर,अभिजीत गाठाळ, व्यंकटेश जोशी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे, उपमुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की, प्रसिद्धी प्रमुख केदार वाघमारे,प्रमोद शिंदे यांनी प्रयत्न केले.

# अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी राजकिशोर मोदी यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ जानेवारी**

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी प्रदेश अध्यक्ष राजकिशोर मोदी यांची सर्वानुमते बिनविरोध पणे निवड करण्यात आली आहे. मागील महिन्यात ओंकारेश्वर येथे अखिल भारतीय सर्ववर्गीय जायसवाल महासभेची बैठक संपन्न झाली होती . या बैठकीत महाराष्ट्रासह देशभरातून जायसवाल बांधव सहभागी झाले होते. या बैठकीत मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची निवड समिती गठीत करून यातून सर्वांनी विचार विनिमय व चर्चा करून एकमताने राजकिशोर मोदी यांची आगामी २०२५ ते २०२८ या काळासाठी जायसवाल महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे अशोक जायसवाल यांच्या वतीने जाहीर करण्यात आले.

अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे सध्या अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळला आहे. महाराष्ट्र प्रदेश जायसवाल संघटनेच्या अध्यक्ष पदाची जवाबदारीही राजकिशोर मोदी हे लिलया सांभाळत आहेत. त्यांनी प्रदेशअध्यक्ष पदाच्या कालखंडात समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांचे शैक्षणिक , सामाजिक तसेच आर्थिक क्षेत्रात देखील मोठे योगदान आहे. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक, श्री योगेश्वरी मल्टिस्टेट, श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था, त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघाचे उपाध्यक्ष म्हणून करत असलेल्या कार्याची दखल व समाजासाठी



कार्य करण्याची धडपड लक्षात घेऊन त्यांना सर्वानुमते राष्ट्रीय अध्यक्ष पदावर नियुक्त करण्याचे ठरवून त्यांना तशी संधी देण्यात आल्याचे एकमुखाने झाल्याचे जाहीर करण्यात आले. राजकिशोर मोदी यांनी आपल्या आजपर्यंत च्या कालखंडात महासभेच्या अनेक ठिकाणी बैठका व सामाजिक उपक्रम घेऊन समाज पुढे नेण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत. यापुढेही त्याचप्रमाणे समाजासाठी सदैव कार्यतत्पर राहनार असल्याची भावना राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली.

अंबाजोगाई शहरात आगामी काळात अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे राष्ट्रीय महाअधिवेशन संपन्न होणार असून यामध्ये मावळते राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल यांच्याकडून राजकिशोर मोदी यांचा पदग्रहण व शपथ ग्रहण सोहळा देखील संपन्न होऊन ते २०२५ ते २०२८ पदासाठी महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेऊन महासभेच्या कार्यभार सांभाळनार आहेत. राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात समाजातील तरुण तरुणींना उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन त्यांना प्रेरित करण्यात येणार असल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सांगितले. त्याचबरोबर समाजातील सर्व वर्गीय घटकांना सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. राजकिशोर मोदी यांची राष्ट्रीय अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्याचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होऊन त्यांना पुढील काळासाठी शुभेच्छा प्राप्त होत आहेत.

# उमेदच्यावतीने महिला बचत गटाचे जिल्हास्तरीय मिनी सरस विक्री प्रदर्शन

## जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेहस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोंन्नती अभियान जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हिंगोली अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष मुंबई यांच्या सूचनेप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय व विभाग स्तरीय मिनी सरस विक्री प्रदर्शनीचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेहस्ते करण्यात आले.

येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या मैदानावर दिनांक ०६ जानेवारी ते १० जानेवारी आयोजीत करण्यात आले आहे. दिनांक ०६ जानेवारी रोजी कार्यक्रमाचा शुभारंभ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूजनाने करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार,प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रम सारस्वत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कुलकर्णी, समाज कल्याणअधिकारी राजू येडके, गटविकास अधिकारी तोटावाड, बनसोड यांची उपस्थिती होती.

प्रदर्शनामध्ये एकूण ८० बचत गटाचे विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आलेले आहेत. यामध्ये विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले अन्नधान्य, हस्तकलेच्या वस्तू, हळद, मसाले, मठ्ठा, प्रसिद्ध गावरान मेवा, दही धपाटा, शीतपेय, कटलेरी व्यवसाय, कापड व्यवसाय, विविध प्रकारच्या डाळी, मशरूम, व गटांनी स्वतः तयार केलेले सौंदर्य क्रीम यासारख्या सर्व वस्तू पदार्थ हे स्टॉलमध्ये उपलब्ध आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव केंद्रे यांनी केले. मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी महिलांनी नावीन्यपूर्ण उत्पादन तयार करण्यावर भर द्यावा तसेच सर्व विभागातील कर्मचारी यांनी भेट जास्तीत जास्त विक्री करावी असे आवाहन केले. जिल्हाधिकारी गोयल यांनी प्रत्येक तालुक्यामध्ये मिनी क्लस्टर तयार करून पॅकेजिंग, लेबलिंग, मार्केटिंगवर भर देऊन त्यानुसार महिलांना जास्तीत जास्त उत्पन्न मिळून देण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे आवश्यक आहे. या भव्य विक्री प्रदर्शनाला भेट देऊन बचत गटांचा उत्साह वाढवावा असे आवाहन केले. याप्रसंगी गटांनी लावलेल्या सर्व स्टॉलला भेट देऊन जिल्हाधिकारी गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी भोसले यांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन विक्रम सारस्वत यांनी तर आभार राम मेकाले यांनी केले. सदर मिनी सरस यशस्वी करण्यासाठी सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अधिकारी कर्मचारी उमेद अधिकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# आ. राजूभैय्या नवघरे सेवा प्रतिष्ठानच्यावतीने मॅरेथॉन स्पर्धा

## राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचेहस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ६ जानेवारी**
आ. राजुभैय्या नवघरे सेवा प्रतिष्ठानच्यावतीने ५ जानेवारी रविवारी वसमत येथे भव्य वसुमती मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे उद्योग सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आ. राजुभैय्या नवघरे यांच्याहस्ते करण्यात आले. या स्पर्धेत किमान २००० च्या वर स्पर्धकांनी सहभाग घेतला.

आ. राजुभैय्या नवघरे यांच्या पुढाकारातून व राजुभैय्या सेवाप्रतिष्ठानच्या माध्यमातून जिल्ह्यातील नव्हेतर राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे तसेच माझे शहर तंदरुस्त शहर रहावे करीता सलग दुसऱ्या वर्षीही वसुमती मॅरेथॉन स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. मयुर मंगल कार्यालय वसमत येथे सकाळी ठिक ७ वाजता आयोजीत केली होती. या स्पर्धेत वेगवेगळ्या गटातील मुलां-मुलींसाठी ही स्पर्धा आयोजीत केली होती. व तसेच त्यांचे राहण्याची व जेवणाची सोय मयूर मंगल कार्यालय व हॉटेल व्यंकटेश्वरा येथे करण्यात आली होती. यावेळी उपस्थित राज्याचे उद्योग सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार राजू भैया नवघरे, उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार शारदा दळवी, पोलीस उपाधीक्षक केंद्रे, माजी नगराध्यक्ष शिवदास बोडेवार, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, शहराध्यक्ष मुजीब पठाण, शेख मोबीन, गजमल, बारी, फिरोज पठाण यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# पूर्णा नदीच्या पात्रातून टिप्परसह ४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

## पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**
वसमत तालुक्यातील परळी दशरथे शिवारातील पूर्णा नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक करणारे तीन टिप्पर सह ४५ लाख २० हजारांचा मुद्देमाल पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने जप्त केला आहे. या प्रकरणी टिप्पर चालकांवर सोमवारी दि ६ जानेवारी रोजी हट्टा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसमत तालुक्यातील परळी दशरथे शिवारात पूर्णा नदीचे पात्र असून या ठिकाणावरून मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी वाळूचा उपसा करून वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होतय. त्यानुसार पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक स्थापन करण्यात आले.

दरम्यान आज पहाटेच्या सुमारास विशेष पथकातील उपनिरीक्षक सतीश ठेंगे, जमादार शामराव गुहाडे, सुभाष घोडके, निखील बारवकर, गुन्हे शाखेचे जमादार संदीप जाधव, सुभाष घुगे, ज्ञानेश्वर सावळे, दिलीप बांगर यांचय पथकाने साध्या वेशात जाऊन पूर्णा नदीच्या पात्रात सापळा रचला. यावेळी पहाटेच्या सुमारास येणाऱ्या व्यक्ती पोलिसच असल्याचे लक्षात येताच टिप्पर चालकांनी घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी त्याठिकाणी पाहणी केली असता तेथे एका टिप्परमध्ये चार ब्रास वाळू भरलेली आढळून आली तर दोन टिप्पर वाळू भरण्यासाठी उभे होते. पोलिसांनी तीन टिप्पर व वाळू असा ४५ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी उपनिरीक्षक सतीश ठेंगे यांच्या तक्रारीवरून टिप्पर चालकांवर हट्टा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक संग्राम जाधव पुढील तपास करीत आहेत. पोलिसांनी टिप्पर चालकांचा शोधध सुरू केला आहे.

जिल्ह्यात हिंगोली, कळमनुरी, वसमत, सेंनगाव, औंढा नागनाथ तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अजूनही नदीपात्रातून चोरून वाळूचा उपसा होत आहे. महसूल विभाग थातूरमातूर कार्यवाही करीत आहे. या धंद्यातील मोठ्या माशांना पकडण्यात अद्यापही यश आले नाही.

# दर्पण दिनानिमित्त व्यापारी महासंघाकडून पत्रकारांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**
जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने दर्पण दिनाचे औचित्य साधून हिंगोली शहरातील पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला पत्रकार भवनाचा प्रश्न लवकरच मार्गी लावणार असून पुढचा दर्पण दिनाचा कार्यक्रम त्या पत्रकार भवनात केल्या जाईल असे आश्वासन आमदार तानाजी मुटकुळे यांनी दिले कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुनील देवडा हे उपस्थित होते.



दर्पण दिनानिमित्त हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने शहरातील पत्रकार, प्रेस फोटोग्राफर तसेच विविध वृत्तवाहिन्यांचे व समाज माध्यमांचे प्रतिनिधी यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला जात तुकाराम झाडे, वसंत भट्ट, जेष्ठ पत्रकार शरद जयस्वाल, सुभाष अपूर्वा, कल्याणराव देशमुख, गजानन लोंढे, बाबुराव ढोकणे, गजानन मगर, राजेंद्र हलवाई,अब्दुल हफिस बागवान, सुनिल पाठक, चंदू वैद्य, प्रकाश इंगोले, श्रीरंग शिरसाठ, निलेश गरवारे, मकरंद बांगर, राजेश दारवेकर, गोपाळ सरनाईक, सचिन कावडे, राकेश भट्ट, सुधिर गोगटे, पल्लवी अट्टल, गजानन पवार, मनीष खरात, समाधान कांबळे, दिलीप हळदे, प्रसाद आर्वीकर, बालाजी पाठक, श्याम सोळंके, पिंटू नागरे, सुधाकर वाढवे, जोशी, बलखंडे, विजय गुंडेकर, व्यापारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष अनिल नैनवाणी, जिल्हाध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, दिलीप चव्हाण, कैलास काबरा, शहराध्यक्ष सुमित चौधरी, रवींद्र सोनी, बाबाराव बांगर, आनंद अग्रवाल, प्रशांत सोनी, श्याम खंडेलवाल राजेश बगडिया, जगजीतराज खुराणा, गजेंद्र बियाणी, हमीद भाई प्यारेवाले आदीची प्रमुख उपस्थिती होती.

येथील जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार केला. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि विकास पाटील आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### ऑलिंपियाड स्पर्धेत दराडे विद्यालयाचे यश



हिंगोली- भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील तीन मुलींनी नॅशनल सायन्स ऑलिमपियाड स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले आहे. कु.राधिका राजेश अंभोरे, कु. श्रद्धा राजीव वानखेडे, कु. कनिश्का अरुण चोंढेकर या इयत्ता आठवी च्या विद्यार्थिनीनी या परीक्षेत यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थिनींना अध्यापिका सौ. जयश्रीताई धुमाळ/गायकवाड मॅडम यांनी मार्गदर्शन केले. याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थीनी व अध्यापिका यांचा शाळेच्या व संस्थेच्या वतीने सत्कार केला. संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### हिंगोलीत चातुर्मास योजनेचा समारोप

हिंगोली- येथील शिवाजीनगर च्या दत्त मंदिराच्या सभागृहामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सेवा भारती देवगिरी प्रांत यांचा चातुर्मास योजनेचा समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला. आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन इत्यादी क्षेत्रांमध्ये समाजाची सेवा करण्यासाठी निधी संकलनासाठी सेवा भारती तर्फे चातुर्मास योजने त अंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येतो. या चातुर्मास योजनेमधून निधी समाजकार्यासाठी संकलित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्तृया सौ.सुरेखा दराडे, सेवा भारतीच्या जिल्हा अध्यक्षा सौ. गीता कैलास कोटकर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कु. क्षितिजा जाधव सहाय्यक नगर रचनाकार जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली व सौ.डॉ.पूजा तोष्णीवाल ह्या उपस्थित होत्या तर यावेळी सौ. इंचेकर, सौ. देशपांडे, सौ. भारती, सौ. गाजरे, सौ. ड.शारदा भट ,सौ. धर्माधिकारी, सौ. काबरा व इतर मान्यवर महिला सह सेवा भारती जिल्हा हिंगोली च्या स्वयंसेवक भगिनी व मातृशक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### ९ वाहनचालकांवर कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९ वाहन चालकांवर कार्यवाही करण्यात आली

# कळमनुरीत वनविभागाच्या पथकाने सागवान पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**
कळमनुरी शिवारात अवैधरित्या सागवान तोडून आणल्याची माहीती मिळाल्यानंतर वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार यांच्या पथकाने रविवारी पहाटे पथकासह घटनास्थळी जाऊन सागवान जप्त केले आहे.

कळमनुरी तालुक्यातील जंगलातून अवैधरित्या सागवानाची झाडे तोडून त्याची वाहतुक केल्या जात असल्याच्या तक्रारी मागील काही दिवसांपासून सुरू होत्या. त्यामुळे वन विभागाचे पथक या भागात दिवसरात्र गस्तीवर होते. त्यासाठी वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार यांनी पथके स्थापन केली होती. या पथकांना दररोज माहीती घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र पहाटेच्या वेळी पथके परतल्यानंतर सागवान तोडून वाहतूक केली जात असल्याचे दिसून आले.

दरम्यान, रविवारी पहाटेच कळमनुरी शिवारात सागवान तोडून त्याची वाहतूक करीत साठवणूक करण्यात आल्याची माहीती वन विभागाला मिळाली होती. त्यावरून विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, कर्मचारी स्वप्नील क्षीरसागर यांच्या पथकाने कडाक्याच्या थंडीत पहाटे पाच वाजल्यापासूनच परिसरात शोध मोहीम हाती घेतली होती. यामध्ये काही जणांनी सागवान तोडून साठवणूक केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर वन परिक्षेत्र अधिकारी पवार यांनी पथकासह कळमनुरी शिवारात जाऊन सागवान जप्त केले आहे. याप्रकरणी पुढील कारवाई सुरू असल्याचे वन विभागाच्या सुत्रांनी सांगितले. वन विभागाकडून झालेल्या कारवाईमुळे अवैधरित्या सागवान तोडून वाहतुक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

# हिंगोलीत पत्रकारांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**
पत्रकार दिनाचे औचित्य साधून श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली तर्फे जिल्ह्यातील पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. सहा जानेवारी हा दिवस दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा स्मृतीदिन पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. याच पत्रकार दिनाचे औचित साधून आपल्या लेखणीने समाज जागृतीचे मौलिक काम करणारे जिल्हाभरातील वृत्तपत्राचे सन्माननीय जिल्हा प्रतिनिधी, पत्रकार, प्रेस फोटोग्राफर, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी, डिजिटल मीडिया प्रतिनिधी यांचा शॉल, पुष्पहार तसेच डायरी व पेन भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. पत्रकार आपल्या लेखणीने समाज प्रबोधन करत निस्वार्थपणे समाजसेवेचे कार्य करत असतात त्यांच्या या समाजसेवेची पोचपावती म्हणून सन्मान करत असल्याचे श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार तोष्णीवाल यांनी सर्व पत्रकारांना पत्रकारीतेला गालबोट लागणार नाही याची दक्षता घेत आपले काम प्रामाणिकपणे करावे अशी आशा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार मोरगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार पत्रकार पिंटू उर्फ संदीप नागरे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी अध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे, एकनाथराव कुटे, संजय बांगर, प्रा.संजय चाटे, राजकुमार मोरगे, गोपाल बांगर, पिंटू नागरे आदींनी परिश्रम घेतले.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी राज्यात पहिली मुलींची शाळा सुरू करून महिलांना जगण्याचा अधिकार दिला. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरूषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. सावित्रीबाई फुले यांच्या योगदानामुळे हे शक्य झाले आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा तसेच हिगोली येथे होत असलेल्या महिला शासकीय रूग्णालयाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नुनीर कौसर पठाण यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी संगीता कांबळे, गजानन वैद्य, गजानन कावरखे, संदीप पाटील, प्रवीण पातोडे, राजु वाघमारे, राधाबाई कावरखे, दत्ता उचितकर यांची उपस्थिती होती.

# पान मसाला झाला स्वस्त; पोलिसांचा आशीर्वाद ?

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ जानेवारी**

राज्यात प्रतिबंध असलेल्या पान मसाल्याचे दर कमी झाले आहेत. गुटखा तथा पान मसाला आवक वाढल्यामुळे दर कमी झाल्याचे बोलले जात आहे. परंतु गुटख्याची मोठ्या प्रमाणात आवक होण्यामागे पोलिसांचा आशीर्वाद आहे की काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राज्यात पान मसाला, गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर बंदी असली तरी मोठ्या प्रमाणात या पदार्थांची विक्री करण्यात येते. कुठल्याही किराणा दुकान, पान टपरीवर




गुटखा सहजपणे उपलब्ध आहे. पोलीस प्रशासन देखील अनेकवेळा कारवाया करत लाखोंचा गुटखा जप्त करतात. राज्यात गुटखा बंदी असल्यामुळे चढ्या दराने पान मसाला तसेच गुटखा विक्री करण्यात येत आहे. परंतु मागील काही दिवसापासून पान मसाला, गुटखा स्वस्त मिळत आहे. गुटखा माफीयांनी मोठ्या प्रमाणात गुटख्याची आवक केली असावी असा संशय व्यक्त होत आहे.

राज्यात गुटखाबंदी असतानाही एवढ्या मोठ्या प्रमाणात पान मसाला तसेच तंबाखूजन्य पदार्थांची आयात होते कशी असा प्रश्न उपस्थित होत आहे. पान मसाल्याचे दर कमी झाल्याने गुटखा शौकीन आनंदित झाले असले तरी पान मसाल्याची जिल्ह्यात आवक होण्यामागे पोलिसांचा आशीर्वाद आहे की काय? असाही प्रश्न जनता उपस्थित करत आहे.

# माळेगाव यात्रा ही शेतकऱ्यांच्या परिश्रमांचा सन्मान करण्याचे व्यासपीठ : आ.प्रताप चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०६ जानेवारी**

शेतकरी व पशुपालक आपल्या जनावरांवर मुलाप्रमाणे प्रेम करतो, त्यांची काळजी घेतो. माळेगाव यात्रा ही केवळ उत्सव नसून शेतकऱ्यांच्या परिश्रमांचा सन्मान करण्याचे व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने श्रीक्षेत्र माळेगाव येथे पशु, अश्व, श्वान, शेळी, कुक्कुट प्रदर्शन व दुग्ध स्पर्धेचे निकाल जाहीर झाले. आज माळेगाव येथे बक्षीस वितरण आ. प्रतापराव चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, यात्रा सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पाडीलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, गट विकास अधिकारी दशरथ आडेराघो, कल्याणकर सावकार सूर्यवंशी, डॉ. प्रमोद पाटील चिखलीकर, आनंदराव ढाकणीकर, सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, बाळू बाबर, रोहीत पाटील अंडगेकर, अनिल बोरगावकर, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, पोलीस निरीक्षक संजय निरपत्रेवार, डॉ. सुनील गिरी, डॉ. निरंजन बागल, डॉ. उपेंद्र गायकवाड, आदींची यावेळी उपस्थिती होती.



पुढे ते म्हणाले, माळेगाव यात्रेचा पशुपालकांच्या मेहनतीला व शेतकऱ्यांच्या कष्टाला सलाम करणारा वारसा कायम राखत यंदा लाल कंधारी वळूसह यावर्षापासून मादी गटासाठी देखील चॅम्पियनशिप पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले.

माजंरमचा लाल कंधारी वळू तर हासूळची गाय ठरली चॅम्पियन जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेतील बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत लाल कंधारी वळू मध्ये नायगाव तालुक्यातील माजंरम यथील पशुपालक श्रीपती देवराव शिंदे यांचा वळू माळेगाव चॅम्पियन तर सुमीत्रा रामेश्वर सुर्यकांबळे यांची देवणी गाय माळेगाव चॅम्पियन ठरली आहे. या दोन्ही पशुपालकांना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते अनुक्रमे लाल कंधारी वळू पालकास १ लाख रुपये तर गाय पालकास रुपये ५० हजाराचा धनादेश व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. यावेळी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धतील विजेत्यांना यावेळी रोख रक्कम व प्रमाणपत्र वाटतप करण्यात आले. शेवटच्या दिवशी कुस्त्यांचा फड आणि अश्व शर्यतही माळेगाव येथे पार पडली. २९ डिसेंबर पासून या ठिकाणी कृषी, माती, शेती, पशुशी संबंधित विविध उपक्रम जिल्हा परिषद नांदेड लोहा पंचायत समिती व माळेगाव ग्रामपंचायत मार्फत राबविण्यात आले. ऐतिहासिक व पारंपारिक यात्रेनिमित्त विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. आज शासकीय कार्यक्रमाच्या आयोजनाचा समारोप करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मारोती साखरे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा


**बिलोली**-मौजे गंजगाव ता. बिलोली येथे मारोती धोंडीबा साखरे सहशिक्षक जि.प.प्रा. शाळा माचनूर येथे कार्यरत होते. दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची नियत वयोमानानूसार निवृती झाली. दि. ०१ जानेवारी २०२५ रोजी ग्रा.पं. व जि.प.प्रा. शाळा गंजगावच्या वतीने नागरी सत्कार संपन्न झाला. मारोती साखरे यांनी दि. ०२ जुलै २००१ पासून ३१ मार्च २०१४ पर्यंत वस्ती शाळेवर अल्पशा मानधनावर ज्ञानदानाचे काम केले. त्यानंतर त्यांना ०१ मार्च २०१४ पासून शासन सेवेत शिक्षक म्हणून जि.प.प्रा. शाळा जिवळा येथे काम केले. अलिकडील काळात दिड वर्ष ते मौजे माचनूर येथे सहशिक्षक म्हणून कार्य केले आणि दि. ०१ जानेवारी २०२५ रोजी त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच सुनिता हणमंतराव कनशेट्टे, माणिक बासरे, गोंवीद पाटील, अरिफ पठाण, दतात्र्य गायकवाड, मारोती घाटे, माधव घाटे, अरूणा मठपती, चंद्रकला घाटे, बरबडे सर, शेख खमरोद्दीन शेख, ॲड. कापसे व सर्व गावकरी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी साखरे सरांच्या संघर्षमय जीवनन प्रवासाची यशोगाथा आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

### माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**हदगाव**-तालुक्यातील पंचशील विद्यार्जन हायस्कूलमधील २००२-२००३ बॅचचा म्हणजे तब्बल २२ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन शाळेच्याच मैदानात पार पडला. दि. ५ जानेवारी रोजी पार पडलेल्या या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांकडून शाळेच्या शिक्षकाचे शाल सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. माजी विद्यार्थी - विद्यार्थिनी पुन्हा एकदा एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला.शाळा संपल कुणी कॉलेज करण्यासाठी गाव सोडले कुणी शेतीत रमले कुणी व्यवसायात गुंतले तर कुणी नोकरीच्या निमित्ताने मोठ्या शहरात गेले व तिथेच स्थायिक झाले मात्र २२ वर्ष उलटून गेल्यानंतरही त्यांच्यातील मैत्रीचा ओलावा मात्र कायम राहिला शाळेत वर्गमित्रांशी जुळलेली नाळ तशीच राहावी सर्वांनी पुन्हा एकदा भेटावे एकमेकांबाबत जाणून घ्यावे हितगुज करावे यासाठी पंचशील हायस्कुल च्या वर्गमित्रांचा शाळेच्या मैदानातच येथे स्नेहसंमेलन सोहळा रंगला. स्वरुची भोजानाने व सर्वांना भेट वस्तू देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. शाळेतील माजी विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. शासकीय, पत्रकार, उद्योजक तर कुणी व्यवसायिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे. या स्नेहसंमेलन कार्यक्रमास संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांचा सह गुरुवर्य म्हणून श्रीमती के. एल. हदगावकर, जी. आर. बेंद्रेवार (मुख्याध्यापक) बी. के. डोरले, जी. इन. गोरे, एन. सी. काळबांडे, श्रीमती जे. एम. चांदपुरे, ए. जे. दस्तुरकर, बी. आर. ताडेवार, डी. के. हुलकाने, बि के बोएनवड इत्यादी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे रूपरेषा व जबाबदारी म्हणून माजी विद्यार्थी शिवशंकर शिंदे, प्रा. डॉ. शेख हुसेन, सागर भंडारे, ऋषिकेश कवानकर यांच्यासह सहकारी मित्रांचे मुलींचे देखील सहकार्य लाभले व त्यावेळी वर्गमित्र समितीतर्फे सर्वांचे आभार देखील मानण्यात आले.

### प्राचार्य डॉ.एल.एस. देशपांडे यांचे निधन

**नांदेड**-शहरातील प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे निवृत्त प्रार्चार्य तथा इंग्रजी विषयाचे विभाग प्रमुख डॉ.एल.एस.देशपांडे यांचे दि. ६ जानेवारी



रोजी पहाटे ३ च्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले. ते .८५वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, शिक्षक रवींद्र, सुरेंद्र ही २ मुले, सुना, मुलगी सौ.ज्योती किवळेकर, जावई,६ नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी दि. ६ जानेवारी रोजी सकाळी १० च्या सुमारास राहते घर कोसला समर्थनगर धनेगाव नांदेड येथून निघाली. जुन्या नांदेडमधील ब्रह्मपुरी तारातीर्थ घाटावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शिक्षण, सिंचन आणि आरोग्य यावरच भर देऊन आगामी काळात नवक्रांती घडवणार : आ. कोहळीकर

**तभा वृत्तसेवा**
**निवघा (बा),दि. ०६ जानेवारी**

येथून जवळच असलेल्या कोहळी येथील जि. प.प्रा.शाळा नवी आबादी च्या वतीने गावचे भुमीपुत्र नवनिर्वाचित आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांचा सत्कार समारंभाचे आयोजन रविवार ( दि.५ ) रोजी करण्यात आले , यावेळी आ कदम यांचा सपत्नीक सत्कार आणि यथोचित सन्मान करण्यात आला यावेळी व्यासपीठावर आ कदम यांच्यासह माजी जि. प. सदस्य संभाराव लांडगे , शिवसेना उपतालूका प्रमुख बाबूराव काळे , शिवसेना निवघा तळणी सर्कल प्रमुख सुदर्शन पाटील , केंद्रप्रमुख एस. डी शिंदे , माजी विस्तार अधिकारी बंडू पावणे



, माजी केंद्रप्रमुख शिवाजी इंगळे आदी उपस्थीत होते .

सत्कारा नंतर आपले विचार मांडतांना आ कदम यांनी आपल्या शालेय जीवनापासून ते आमदार होण्यापर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेतला यापुढील काळात आपण हदगाव हिमायतनगर तालुक्यातील जनतेच्या सेवेत शिक्षण , सिंचन आणि आरोग्य या तीन प्रमुख बाबीवर विशेष लक्ष देऊन ह्यापुढे हदगाव तालुक्यात नवक्रांती घडवणार असल्याची ग्वाही देतांना त्यांनी ह्या कामी दोन्ही तालूक्यातील शिक्षकांनी मला त्यांच्या शाळेविषयी च्या अपेक्षा सोबतच वेगवेगळ्या सुचना मधून शाळांच्या हितासाठीचे निर्णय घेण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन त्यांच्या गरजा सोडवण्यासाठी प्रसंगी आपण राज्याचे शिक्षणमंत्री ना दादासाहेब भुसे यांच्या कडे वारंवार पाठपुरावा करून तालूक्याच्या शैक्षणिक समस्या दुर करणार असे सांगीतले. या पुढची आपली वाटचाल ही सिंचनावर भर देणारी राहणार असून आपण आमदार नसतांनाही सन २००९ सालापासून पैनगंगा प्रोजेक्ट हाती घेतला असून त्यावेळी च १३२ गावांची लाईफ लाईन म्हणून ज्याकडे पाहीले जाते ती लाईन वॉटर ग्रीड योजना अंमलात आणण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आणि यापुढे ही योजना त्वरीत सुरु करणार असल्याचे सांगत सिंचन कामी कयाधू ब्रँच कॅनाल आणि तळणी ब्रँच कॅनाल च्या दुरुस्ती साठी जवळपास ५५ कोटींची तरतूद करून लवकरच मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. रस्ते , नाल्या , ह्याबाबी च्या समस्या ह्या सुरूच राहतात आणि त्या वरचेवर दुरुस्त कराव्याच लागतात त्यापेक्षा आपण चिरकाळ स्मरणात राहणाऱ्या शिक्षण, सिंचन आणि आरोग्य या बाबीसाठीच पुढील पाच वर्ष झटणार असे आश्वासक मनोगत व्यक्त केले . या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जि. प. प्रा. शाळानवी आबादी कोहळीच्या मुख्याध्यापिका श्रीमती आशा पाटील , सहशिक्षीका श्रीमती विना कदम , शा व्य. समितीचे अध्यक्ष राजेश कदम यांनी प्रयत्न केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष बारुळकर यांनी केले तर आभारप्रदर्शन श्रीमती पाटील यांनी केले .

# कै.मधूकर पा.खतगांवकर यांच्या स्मरणार्थ हभप शितल साबळे यांचा प्रवचन सोहळा व भव्य क्रिडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. ०६ जानेवारी**

कै.मधूकरराव पाटील खतगांवकर यांच्या चौथ्या पुण्य स्मरणार्थ शंकरनगर येथील भव्य प्रांगणात एम.पी.एल च्या भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजन करण्यात आले. साई शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मा.कृषी सभापती स्वर्गीय मधूकरराव पाटील खतगांवकर यांच्या चौथ्या पुण्य स्मरणार्थ भा.बा.पा. खतगांवकर पब्लिक स्कूल रामतिर्थ येथे दि. ६ जानेवारी २०२५ सोमवारी सकाळी सहा



वाजल्या पासुन येथील भव्य प्रांगणात ह.भ.प.शितलताई साबळे यांचा किर्तन सोहळा असुन. रामतिर्थ सह परिसरातील भाविक भक्तांनी ह्या प्रवचनाचा आनंद घेवून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहनही खतगांवकर कुंटूबियांनी केले आहे. प्रवचन सोहळ्याची सांगता झाल्या नंतर येथील भव्य प्रांगणात एमपीएल ची भव्य क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्ह्याचे लोकप्रिय माजी खासदार तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष भास्करराव व पाटील खतगांवकर प्रमुख पाहुणे प्रभाकरराव पाटील खतगांवकर बाळासाहेब पा.खतगां वकर सौ. डॉ.मिनलताई खतगांवकर डॉ.अनंत पा खतगांवकर, रवि पा खतगांवकर, आशिष पा.खतगांवकर, व समस्त खतगांवकर कुंटूबियांनी यांनी या भव्य क्रिडा स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजक प्राचार्य.डि.पि.पांडेय व स्टाफ भास्करराव बापूराव पाटील खतगांवकर पब्लिक स्कूल शंकर नगर च्या वतीने करण्यात आले आहे.



**मुक्रमाबाद**-व्हॉईस ऑफ मिडिया मुक्रमाबाद संपर्क कार्यालयात पत्रकार दिनानिमित्य दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष रज्जाक कुरेशी, सचिव अशोक लोणीकर, उपाध्यक्ष संजय राचलवार, कोषाध्यक्ष शाकेर काझी, प्रसिद्धि प्रमुख ज्ञानेश्वर राजुरे, सह शहरातील सहशिक्षक कल्याणराव थळपत्ते, रमेशराव रकटे, धोडीबा, गडलावार, उत्तम गुमडे आदी उपस्थित होते.

# तरुणांनी आपल्या मनगटातली ताकत मेंदुत आणावी : डॉ. बाळ राक्षसे

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०६ जानेवारी**

आजच्या तरुणांनी आपल्या मनगटातली ताकत आपल्या मेंदुत आनावी आणि त्याचा उपयोग समाज परीवर्तनासाठी करावा असे प्रतिपादन टीस तुळजापुर कॅम्पसचे डायरेक्टर प्रा. डॉ. बाळ राक्षसे हे २०७ वा शौर्य दिना निमित्त तुळजापुर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना म्हणाले.

प्रा. डॉ. बाळ राक्षसे आपल्या मार्गदर्शन पर भाषणात पुढे बोलताना म्हणाले की, ३१ डिसेंबर १८१७ ते १ जानेवारी १८१८ या दरम्यान जो प्रसंग घडला या प्रसंगी पुर्वश्रमी इंग्रजाच्या सैन्यातील ५०० महारांनी जवळपास २८००० हजार सैन्य अंगावर घेवून त्या ठिकाणी शौर्य दाखवले त्या ठिकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी त्या शौर्य स्तंबाला भेट



दिल्यामुळे इथल्या पुर्वश्रमीच्या महारामध्ये एकप्रकारचा आत्मविश्वास निर्मान व्हावा आणि आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी महामानव, विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडखरांनी त्या शौर्य स्थंबाला अभिवादन केले. आणि त्या स्फुतीना पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. आजच्या तरुणांनी मनगटातली ताकत आपल्या बुध्दी मध्ये आनावी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ज्या पध्दतीने बुध्दीच्या जोरावर, विद्वतेच्या जोरावर सर्व समाजाचं परीवर्तन केले तस्याच प्रकारे बुध्दीची ताकत या मनकटातुन आपल्या मेंदु मध्ये यावी यासाठी या शौर्यदिना दिवशी आपण सर्वानी विजय स्थंबाला अभिवादन केले पाहिजे उपस्थित सर्व तरुणांनी व लाहाण बालकानी आपल्या मनगटातली ताकत आपल्या बुध्दी मध्ये आनावी आणि समाज परीवर्तन करावे तरच विजय स्थंबाला मानवंदना दिल्याचे सार्थक होईल. कंधार तालुक्याचे भूमिपुत्र टीस तुळजापुर कॅम्पसचे डायरेक्टर प्रा.डॉ. बाळ राक्षसे यांना तुळजापुर येथे शौर्यदिना निमित्त पहिल्यांदा फटाक्याची अतिषबाजी करण्याचा मान तुळजापुरकरांनी दिला धन्य धन्य बाबासाहेब उपकार तुमचे सामान्यातल्या सामान्य मानसाला किती मोठ केलात असेही शेवटी राक्षसे म्हणाले.

# डॉ.कैलास कानिंदे रेणापूरकर यांना विश्वरत्न सम्मान पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ०६ जानेवारी :**



सामाजिक, राजकीय शैक्षणिक, पत्रकारिता, आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन करणारे डॉ.कैलास गणपतराव कानिंदे यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन पत्रकार दिनाच्या पुर्वसंध्येला वर्धा वेलनेस फाउंडेशनचे संस्थापक सोमया बाजपाई व सह संस्थापक हर्षित बाजपाई यांनी विश्वरत्न सम्मान पुरस्कार नुकताच प्रदान करून सन्मानित केले आहे. भोकर तालुक्यातील मौजे रेणापूर सारख्या ग्रामीण भागात राहून उच्च शिक्षण घेतले आहे नेट(यूजीसी )पीएच.डी.(स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ)डी. सी.बी.एम.डी.(डॉ.बा.आं.म.विद्यापीठ औरंगाबाद)पदव्या मिळविल्या आहेत. भोकर तालुक्यातील दहा गावात उपसरपंचावर कारभार चालत होता त्या गावांना सरपंच पद मिळवून देण्यासाठी शासन प्रशासनाशी वेळोवेळी पाठपुरावा करून त्यांनी सरपंच पद मिळवून दिले.

# निवडणूक प्रक्रियेत विद्यार्थांचा सहभाग लोकशाहीसाठी महत्त्वाचा : अबिनाश कुमार



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०६ जानेवारी**

इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी एनएसएस (राष्ट्रीय सेवा योजना) अंतर्गत नांदेड विधानसभेच्या २०२४ निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावल्या बद्दल नांदेड पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते सत्कार दिनांक ६जानेवारी रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथे करण्यात आला. या प्रसंगी बोलताना म्हणाले कि निवडणूकी सारख्या राष्ट्रीय कार्यात मदत करणे लोकशाहीसाठी महत्त्वाचे आहे.

विधानसभा २०२४ निवडणूक जागरूकता निर्माण करणे आणि निवडणूक प्रक्रियेत मदत करण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या योगदानाबद्दल त्यांचा आणि त्यांच्या मार्गदर्शकांचा नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी विद्यार्थ्यांचा अशा कार्यक्रमांतील सहभाग स्तुत्य असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांचा सहभाग निवडणूक प्रक्रियेत लोकशाहीसाठी महत्त्वाचा ठरतो, असे नमूद केले. अशा उपक्रमांमुळे तरुणाईची जाणीवशक्ती जागृत होऊन त्यांना समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते. या कार्यक्रमाचे आयोजन पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड येथे करण्यात आले.

सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी भारतातील युवा हा भविष्याची संप्पती आहे असे संबोधित केले आणि विद्यार्थ्यांचा योगदानाचे कौतुक केले. इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत येणाऱ्या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. राज कदम यांनी विद्यार्थानी समाज उपयोगी कार्यात योगदान द्यावे या साठी धडपड करत असतात. इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विजय नवघरे यांनी विद्यार्थाच्या सत्काराबद्दल सांगितले की, तरुणाईत देश बदलण्याची ताकद आहे. सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# मोफत आरोग्य रोगनिदान शिबिरात सातशे रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०६ जानेवारी**

मुदखेड नगरीत स्व. राजमनीबाई विश्वनाथराव गोडसे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित मोफत महाआरोग्य रोगनिदान शिबिरात सातशे रुग्णांची तपासणी करण्यात आली असून पाचशे रुग्नांना मोफत चष्म्यांचे तसेच औषधींचे वाटप करण्यात आले आहे. गेल्या नऊ वर्षांपासून गोडसे परिवाराच्या वतीने सामाजिक बांधिलकीचा अभिनव उपक्रम राबविला जात असून कौतुकास्पद ठरला आहे

माजी उपनगराध्यक्ष बालाजी गोडसे, कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष कैलास गोडसे, सुरेश गोडसे या भावंडांच्या संकल्पनेतून शहरातील तसेच ग्रामीण भागातील विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक उपक्रम राबविले जातात. स्व. राजमनीबाई गोडसे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि.४ जानेवारी रोजी महाआरोग्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गोडसे परिवाच्या वतीने प्रतिमेचे पूजन करून



सामूहिक रित्या अभिवादन करण्यात आले आहे. कॉंग्रेस कमिटीचे जिल्हा कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर, कॉंग्रेस कमिटीचे तालुका कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, धोरन व संशोधन विभागाचे अध्यक्ष माधव हामंद, शेख करीम खाँ साहब, युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, गोविंद कालनी, शंकर राठी, केशवराव कदम, अतिक अहमद, आकाश सोनटक्के, संजय बोकेफोड, वेदांत शेवटे, बाळुतार शेट्टे, सुमित गोडसे, साई गोडसे, गणेश गोडसे, इमरान मच्छिवाले, गोविंद गोडसे, लक्ष्मण शहाने, शिवानंद देवके, यशवंत रनखांबे, गोविंद माळकोठे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ वृशाली एमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाआरोग्य रोगनिदान शिबिरात नेत्ररोग, मधुमेह, रक्तदाब आदी रुग्णांची तपासणी करण्यात आली. हिंद लॅब यांच्याकडून रुग्णांचे रक्त तपासण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल नागशेट्टीवार, डॉ प्रदीप उमनवार, डॉ गोवर्धन तातेवार, शुभम कांबळे, प्रदीप कांबळे यांनी रुग्णांची तपासणी केली. अशोक मामीडवार, राम पाचपोळे, विशाखा कनकुटे, साहेबराव खंडेलोटे, दीक्षा कांबळे, गजानन गोरे, या सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

